महाराष्ट्र जनशक्ती

**ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती


# महाराष्ट्र जनशक्ती

**मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार**






छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २१६ वे | दिनांक : ०१/०८/२०२६ | वार : शनिवार

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०१ ऑगस्ट २०२६


## गोदावरी पब्लिक स्कूलमध्ये "मुले रंगली काव्यात"



*छायाचित्र:- " मुले रंगली काव्यात" एकपात्री कार्यक्रम सादर करतांना कवी आयुब पठाण लोहगावकर व मान्यवर आणि विद्यार्थी दिसत आहे.*

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** हडको येथील गोदावरी पब्लिक स्कूल मध्ये नुकतेच लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या प्रथम जयंती निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी एकपात्री सांस्कृतिक कार्यक्रम अय्युब पठाण लोहगावकर यांनी सादर केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शिक्षक आमदार विक्रमजी काळे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण महर्षी श्री. डॉ. बाळासाहेब पवार हे होते. यावेळी डॉ. बाळासाहेब पवार यांनी स्व. अजीतदादा यांच्या प्रतिमेला अभिवादन करून अजीजदादा पवार यांच्याविषयी जुन्या आठवणींना उजाळा दिला. त्यानंतर शिक्षक आमदार विक्रमजी काळे यांनीही जयंतीनिमित्ताने यथोचित मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रसिध्द कवी तथा लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी " मुले रंगली काव्यात " हा एकपात्री सांस्कृतिक, विनोदी कार्यक्रमातून भारूडे, विनोदी पाळणे, काव्यवाचन, नकला, उखाणे, सादर करून विद्यार्थ्यांचे मनोरंजन व प्रबोधन करून त्यांना भरपूर हसविले. शेवटी " आई " ही कविता मधूर आवायात सादर केल्याने सर्व विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले होते. यावेळी गोदावरी पब्लिक स्कूलच्या प्राचार्या श्रीमती शुभांगीताई काळे, उपमुख्यध्याप, पर्यवेक्षक भांबरेसर, राऊत, श्रीमती बहिरगावकर मॅडम, प्रदीप विखे, कवी मनोज खुटे यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक- शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग, विद्यार्थी हे मोठया संख्येने उपस्थित होते.

## जालना जिल्ह्यातील कुंभारझरीचे... हभप सोनुने गुरुजींच्या दिंडीला द्वितीय पुरस्कार




**जालना (प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे) :** आषाढी वारी दरम्यान शिस्तबद्ध, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक दिंड्यांना प्रोत्साहन देण्यासाठी श्री. विठ्ठल-रुक्मिणी देवस्थान पंढरपूर संस्थानाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही 'उत्कृष्ट दिंडी पुरस्कार' ह.भ.प. साळुबा सोनुने गुरुजी बाबांच्या दिंडीला द्वितीय पुरस्कार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या तर्फे गौरविण्यात आले,हे विशेष ,पुरस्काराच्या मूल्यमापनाचा आणि वारीतील व्यवस्थांचा आढावा घेण्याच्या उद्देशाने देवस्थानच्या विश्वस्त मंडळाने कुंभारझरी (ता. जाफराबाद, जिल्ह्य- जालना.) येथील 'वारकरी धर्मसंकीर्तन सेवा प्रतिष्ठान'च्या स्वग्राम ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्यास आकस्मिक भेट देऊन पाहणी केली. या वेळी दिंडीतील शिस्तबद्धता, पर्यावरण पूरकता आणि वारकरी परंपरेचे पालन पाहून विश्वस्तांनी दिंडीचे कौतुक केले.पर्यावरण पूरकता आणि शिस्तीचा आदर्शह.भ.प. साळुबा सोनुने गुरुजी यांच्या नेतृत्वाखाली ही पायी दिंडी पंढरपूरात होती. वारीतील दिंड्यांचा दर्जा, वारकऱ्यांची शिस्त आणि सोयी-सुविधांची पाहणी करण्याच्या उद्देशाने पंढरपूर देवस्थानचे विश्वस्त हभप. शिवाजी मोरे, हभप.प्रकाश जवंजाळ आणि हभप. माधवी निगडे यांनी या दिंडी सोहळ्यास अचानक भेट दिली.दिंडीतील शिस्तबद्धता, अखंड चालणारे पारंपरिक भजन, सर्व वारकऱ्यांचा एकच गणवेश आणि प्लास्टिकमुक्त पर्यावरणपूरक व्यवस्था पाहून हभप विश्वस्त शिवाजी महाराज मोरे यांनी, "ही दिंडी अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आणि आदर्श आहे," असा अभिप्राय दिला. तसेच विश्वस्त हभप प्रकाश महाराज जवंजाळ यांनी इतर दिंडी सोहळ्यांनी देखील या दिंडीचा आदर्श घ्यावा, असे आवाहन केले.महिला वारकऱ्यांच्या शिस्तीची विशेष नोंददिंडीत सहभागी झालेल्या महिला वारकऱ्यांच्या शिस्तीबद्दल बोलताना विश्वस्त हभप माधवी निगडे म्हणाल्या की, "एकाच गणवेशातील महिलांची शिस्तबद्ध उपस्थिती आणि वारीतील त्यांचे योगदान हे या दिंडीचे मुख्य वैशिष्ट्य आहे."विश्वस्त मंडळाचा सत्कारवारीतील शिस्त व परंपरा जपणाऱ्या दिंड्यांना प्रोत्साहन देणे हा या पाहणी भेटीचा मुख्य उद्देश होता. या प्रसंगी 'वारकरी धर्मसंकीर्तन सेवा प्रतिष्ठान'च्या वतीने देवस्थानच्या विश्वस्तांचा सत्कार करण्यात आला. या वेळी शालिकराव म्हस्के, भगवान गायकवाड, भगवानराव चव्हाण, सुनील वायाळ आणि दिंडीतील वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बस दुभाजकावर जाऊन धडकली सुदैवाने बस मधील सर्व प्रवासी सुरक्षित



**दौलताबाद (जावेद अहेमद) :** शुक्रवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास छत्रपती संभाजीनगर नाशिक महामार्गावर महाराष्ट्र पब्लिक शाळेजवळ वैजापूर आगराची वैजापूर कडून छत्रपती संभाजीनगर कडे जाणारी बस क्र MH20 40 N 9904 ही तीस प्रवासी घेऊन छत्रपती संभाजीनगर कडे जात असताना दौलताबाद टी पॉइंट च्या पुढे पेट्रोल पंप जवळ हा अपघात झाला आणि बस रस्त्यावरील दुभाजकावर जाऊन चढली व यात बसचे पुढील काच फुटली आहे त्याचवेळी समोरून कोणतेही वाहन आले नाही यामुळे अनर्थ टळला सुदैवाने बस मधील सर्व प्रवासी सुखरूप वाचले व कोणालाही इजा झाली नाहीयेणाऱ्या जाणाऱ्या प्रवाश्यांनी बस मधील प्रवाशांना सुखरूप उतरून पुढील प्रवासासाठी वेगवेगळ्या वाहनात बसून दिले या अपघाताचे कारण समजू शकले नाही

## हतनूर येथे कृषि विभागाच्या वतीने रानभाजी महोत्सव संपन्न



**कन्नड (अरुण थोरात) :** कृषी विभाग व तंत्रज्ञान विस्तार व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या संयुक्त विद्यमाने हतनूर (ता. कन्नड) येथील रुक्मिणी लॉन्स येथे तालुकास्तरीय रानभाजी महोत्सव व भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवाला परिसरातील शेतकरी, महिला बचत गट आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.कार्यक्रमाच्या प्रारंभी तालुका कृषी अधिकारी संदीप शिरसाठ यांनी प्रास्ताविक केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी निसर्गाचा अनमोल ठेवा असलेल्या विविध प्रकारच्या रानभाजींचे आरोग्याच्या दृष्टीने असणारे महत्त्व, त्यांचे औषधी गुणधर्म आणि पोषणमूल्ये याविषयी सविस्तर माहिती दिली. बदलत्या जीवनशैलीत रानभाज्यांचा आहारात समावेश करणे काळाची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.या महोत्सवात तालुक्यातील महिला बचत गट आणि राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान (NMNF) च्या गटांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवून विविध प्रकारच्या ताजी व औषधी रानभाज्या प्रदर्शनासाठी व विक्रीसाठी मांडल्या होत्या.कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित माननीय आमदार संजनाताई जाधव (आमदार, कन्नड-सोयगाव विधानसभा) यांनी रानभाज्यांच्या स्टॉल्सची पाहणी केली आणि उपक्रमशील महिलांचे भरभरून कौतुक केले. याप्रसंगी प्रमुख उपविभागीय अधिकारी (कन्नड-खुलताबाद) संतोष गोरड, तसेच कन्नडच्या तहसीलदार सारीका भगत यांची विशेष उपस्थिती व मार्गदर्शन लाभले.हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी कृषी विभागातील सर्व मंडळ कृषी अधिकारी, सर्व उप कृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, आत्मा योजनेचे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (BTM) व सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक (ATM), तसेच सर्व महसूल मंडळ व ग्राम महसूल अधिकारी, कन्नड यांनी विशेष परिश्रम घेतले. सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागामुळे हतनूर येथील हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०१ ऑगस्ट २०२६

## दिल्ली आंदोलनाच्या यशानंतर अभिजित दिपके यांना आंबेडकरी विद्यार्थी, नेते व कार्यकर्त्यांची सदिच्छा भेट



**छत्रपती संभाजीनगर :** कॉक्रोच जनता पार्टी (सीजेपी) चे अभिजित दिपके यांनी दिल्ली येथे केलेल्या आंदोलनाला मिळालेल्या यशाबद्दल आंबेडकरी विद्यार्थी, नेते व कार्यकर्त्यांनी त्यांच्या वाळूज महानगर-१, सिडको परिसरातील राहत्या घरी सदिच्छा भेट देत शाल व पुष्पहार घालून त्यांचा सत्कार केला. तसेच त्यांच्या पुढील सामाजिक व परिवर्तनवादी कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी सामाजिक, शैक्षणिक व आंबेडकरी चळवळीशी संबंधित विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. तसेच समता, न्याय, बंधुता आणि परिवर्तनवादी विचार समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचविण्यासाठी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी पँथर रिपब्लिकन विद्यार्थी आघाडीचे नेते गुणरत्न सोनवणे, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष अक्रम खान, संशोधक विद्यार्थी अमरदिप हिवराळे, युवा नेते अमोल भालेराव, अविनाश दाभाडे, कल्पेश साबळे, आदित्य परिहार यांच्यासह आंबेडकरी विद्यार्थी, नागरी मूलभूत हक्क अभियान तसेच कास्ट्राइब कर्मचारी कल्याण महासंघाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## जिद्दीच्या जोरावर ज्ञानेश्वर कोळी पीएसआय



**दौलताबाद (प्रतिनिधी) :** दौलताबाद पोलीस स्टेशन चे अंमलदार ज्ञानेश्वर कोळी यानी जिद्द,मेहनत सातत्याच्या जोरावर पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाली ..दौलताबाद पोलीस स्टेशन येथे अंमलदार पदी कार्यरत आसलेले ज्ञानेश्वर वसंतराव कोळी याची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाली या निमित्ताने दौलताबाद पोलीस स्टेशन च्या वतिने 30जुलै गुरुवार रोजी त्याचा निरोप संभारभ आयोजित करण्यात आला होता या वेळी दौलताबाद पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक नितीन खंडागळे यांनी ज्ञानेश्वर कोळी यांना हार शाल श्रीफळ भेटवस्तू देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या यावेळी त्यानी सांगितले की ज्ञानेश्वर कोळी हे अंमलदार म्हणून कार्यरत होते यानी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वंतिने घेण्यात आलेल्या मर्यादित विभागीय पोलीस उपनिरीक्षक परिक्षा उत्तीर्ण केली या काळात त्यांनी अंमलदार म्हणून असलेले काम सांभाळून जिद्द, मेहनत , सातत्या कायम ठेवत उपनिरीक्षक पदा पर्यत झेप घेतली आहेयावेळी दौलताबाद पोलीस स्टेशन चे पोलीस उपनिरीक्षक आयुब पठाण, बापु डोबाळे,अशोक सोनवणे, तसेच दौलताबाद पोलीस स्टेशन चे सर्व कर्मचारी उपस्थित होते ...

## दुर्योधन जमादार सेवानिवृत




**उमरगा (प्रा.नागसेन कांबळे) :** तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात आज दुर्योधन शंकरराव जमादार हे विहित वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्यामुळे सेवागौरव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्त त्यांचा महाविद्यालयाच्या वतीने सपत्नीक सत्कार करून सन्मानित करण्यात आले. व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर तात्या हिरवे विराजमान होते. त्याचबरोबर संस्थेचे इतर सदस्य , इतर शाखांचे प्रमुख प्रतिनिधी आणि मारुती खमितकर, वैभव मालकरे, श्री. पुरंत, श्री. पाटील,श्री. भालेराव आदींनी दुर्योधन जमादार यांचा यथोचित सत्कार केला. एक गुणी, सेवक आणि प्रयोगशाळा परिचर म्हणून जमादार यांनी ३२ वर्ष अव्याहतपणे परिपूर्ण सेवा केली, त्यांच्या संपूर्ण सेवकाळात त्यांनी कुणाचेही मने दाखवली नाहीत. अतिशय संयमी, शांत आणि विनम्रता हेच त्यांच्या स्वभावाचे गुणवैशिष्ट्ये राहिली. त्यांनी कधीही कुणाशी वैर किंवा संघर्ष केला नाही असे सांगून प्राचार्य डॉ. गुलाब राठोड यांनी त्यांच्या उर्वरित आयुष्यासाठी, आणि निरोगी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. श्रीकृष्ण माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालयातील उपमुख्याध्यापकांनी आपली मनोगते व्यक्त करून जमादार यांना शुभेच्छा दिल्या. प्रा. डॉ. राजाराम निगडे यांनीही दुर्योधन जमादार यांना आपल्या कुटुंबाला जास्तीत जास्त वेळ देऊन आपल्या व्यक्तिमत्वाच्या जोरावर आणखी कर्तृत्व निर्माण करण्याचे आवाहन केले. यावेळी दुर्योधन जमादार यांचे संपूर्ण कुटुंब, अनेक नातेवाईक, आप्तस्वकीय , महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ए. एस. इनामदार यांनी केले तर कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन प्रा. डॉ. डी. पी. चव्हाण यांनी केले, त्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०१ ऑगस्ट २०२६


## वैद्यकीय सहायता कक्षाचे लोकार्पण

**बीड (भगवंत पाळवदे) :** जिल्हाधिकारी कार्यालयात उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते आज करण्यात आले. यावेळी माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी खासदार बजरंग सोनवणे, आमदार धनंजय मुंडे, आमदार प्रकाश सोळंके, आमदार संदीप क्षिरसागर, आमदार विजयसिंह पंडीत, आमदार विक्रम काळे, पालक सचिव डॉ. राजेश देशमुख, आमदार सुरेश धस, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे प्रमुख डॉ. सुधीर राऊत यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या माध्यमातून विविध शासकीय योजनांअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना दुर्धर आजारांवरील मोफत उपचारांसाठी आवश्यक आर्थिक मदत मिळवून देण्याची प्रक्रिया अधिक सुलभ केली जाणार आहे. रुग्णालयात आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता करून आर्थिक सहाय्य मिळविण्यासाठी रुग्णालय, रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांमध्ये समन्वय साधण्याची महत्त्वपूर्ण भूमिका हा कक्ष पार पाडणार आहे.या उपक्रमामुळे गरजू रुग्णांना वेळेत उपचार मिळण्यासाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण होण्यास मदत होणार असून शासनाच्या वैद्यकीय सहाय्य योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचणार आहे

## श्री संत ज्ञानेश्वर विद्या मंदिरात अमली पदार्थ सेवन प्रतिबंधक कायदा विषयावर मार्गदर्शन




**कन्नड (अरुण थोरात) :** शहरातील श्री संत ज्ञानेश्वर विद्या मंदिर, शिवनगर येथे विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने अमली पदार्थ सेवन प्रतिबंधक कायदा या विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात कन्नड शहराचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश दिंडे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश जिरेमाळी यांनी सतीश दिंडे यांचे पुष्पगुच्छ देऊन शाळेच्या वतीने स्वागत केले. त्यानंतर विद्यार्थ्यांना संबोधित करताना श्री. दिंडे यांनी अमली पदार्थांचे वाढते प्रमाण, त्यामागील कारणे आणि त्याचे समाजावर होणारे गंभीर परिणाम याबाबत सखोल माहिती दिली. ते म्हणाले की, अमली पदार्थांचे सेवन हे केवळ व्यक्तीच्या आरोग्यासाठीच घातक नसून त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंब, समाज आणि राष्ट्रावरही होतो. व्यसनामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण, करिअर, मानसिक स्वास्थ्य आणि भविष्य धोक्यात येते. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या अमली पदार्थांपासून दूर राहणे ही प्रत्येक विद्यार्थ्याची जबाबदारी आहे. यावेळी त्यांनी NDPS कायद्याच्या प्रमुख तरतुदी, अमली पदार्थांचे उत्पादन, विक्री, साठवणूक, वाहतूक व सेवन यासंदर्भातील कायदेशीर बाबी तसेच अशा गुन्ह्यांसाठी असलेल्या कठोर शिक्षेबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. सोशल मीडियाच्या माध्यमातून होणारी फसवणूक, मित्रांच्या दबावाखाली चुकीच्या सवयी लागण्याचा धोका आणि संशयास्पद हालचाली आढळल्यास तात्काळ पालक, शिक्षक किंवा पोलीस प्रशासनाला माहिती देण्याचे आवाहनही त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्त, शिस्तबद्ध आणि सुदृढ जीवनशैली स्वीकारावी, नियमित अभ्यास, क्रीडा, वाचन आणि सकारात्मक उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे, असे प्रेरणादायी मार्गदर्शन त्यांनी केले. तसेच “आजचा सजग विद्यार्थी हा उद्याचा जबाबदार नागरिक असतो,” असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना कायद्याचे पालन करण्याची आणि समाजात व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्याची शपथ दिली.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. श्री. दिंडे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना समर्पक आणि सोप्या भाषेत उत्तरे देत त्यांना योग्य मार्गदर्शन केले. उपस्थित विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम अत्यंत लक्षपूर्वक ऐकला व त्यातून महत्त्वपूर्ण माहिती आत्मसात केली. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक प्रकाश जिरेमाळी यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश दिंडे यांचे आभार मानले. त्यांनी अशा प्रकारचे जनजागृतीपर कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगितले. उपस्थित शिक्षकांनीही कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले.

## इं. भा. पाठक महिला महाविद्यालयातील श्रीकांत बहिरगावकर यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयातील ग्रंथालय परिचर श्री. श्रीकांत बहिरगावकर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित सेवापूर्ती गौरव समारंभ उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अन्विता अग्रवाल या होत्या. व्यासपीठावर कार्यालय अधीक्षक सौ. अर्चना कुलकर्णी, प्राध्यापक प्रतिनिधी डॉ. प्रेमला मुखेडकर तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. परभाने यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी पूर्णवेळ व अंशकालीन प्राध्यापक तसेच पतसंस्थेच्या वतीने श्री. बहिरगावकर यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या प्रदीर्घ, निष्ठावान आणि प्रामाणिक सेवेला उपस्थितांनी मनापासून दाद दिली.समारंभात प्रा. ज्योत्स्ना जावळे, श्री. मधु जातोडे, डॉ. पराग चौधरी, डॉ. रजनी सेनाड, प्रा. परभाणे तसेच सौ. बहिरगावकर यांनी मनोगत व्यक्त करताना श्री. बहिरगावकर यांच्या सेवाभावी वृत्ती, कर्तव्यनिष्ठा आणि सहकाऱ्यांशी जपलेल्या जिव्हाळ्याच्या नात्यांच्या आठवणींना उजाळा दिला.अध्यक्षीय समारोपात प्राचार्या डॉ. अन्विता अग्रवाल यांनी श्री. बहिरगावकर यांनी तब्बल ३८ वर्षे अत्यंत प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि समर्पित भावनेने बजावलेल्या सेवाकार्याचा गौरव केला. त्यांचा शांत, संयमी, प्रसन्न आणि हसतमुख स्वभाव तसेच विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांशी अत्यंत आपुलकीने वागण्याची वृत्ती ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये असल्याचे त्यांनी नमूद केले. ग्रंथालयातील पुस्तकांची देवाण-घेवाण करताना त्यांनी नेहमीच विद्यार्थीकेंद्रित आणि सेवाभावी दृष्टिकोन जपला, अशा भावना अनेक मान्यवरांनी व्यक्त केल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रेमला मुखेडकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. सुषमा देशपांडे यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच श्री. बहिरगावकर यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमात श्री. बहिरगावकर यांच्या प्रदीर्घ सेवेला कृतज्ञतेचा भाव व्यक्त करत त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०१ ऑगस्ट २०२६


## देवगिरी महाविद्यालयात पिल्लई HOCL एज्युकेशनल कॅम्पसच्या सहकार्याने ‘AI Beyond’ सेमिनार व उपग्रह मॉडेल निर्मिती कार्यशाळेचे यशस्वी आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे Pillai Institute and Satellite Outreach Programme यांच्या सहकार्याने ‘AI Beyond’ सेमिनार व उपग्रह मॉडेल निर्मिती कार्यशाळा २०२६–२७ उत्साहात आणि यशस्वीरित्या पार पडली. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) आणि अवकाश विज्ञानाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे, तसेच त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.कार्यक्रमाची सुरुवात पिल्लई HOCL एज्युकेशनल कॅम्पसच्या टीमने कार्यक्रमाची रूपरेषा, उद्दिष्टे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता व अवकाश तंत्रज्ञानातील भविष्यातील संधी यांची ओळख करून देत केली.यानंतर ‘AI Beyond’ या विषयावर अफशान खान यांनी प्रमुख वक्त्या म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेची मूलतत्त्वे, शिक्षण, आरोग्य, उद्योग, संशोधन, ऑटोमेशन तसेच भविष्यातील करिअरच्या2 संधी याविषयी सविस्तर माहिती दिली. सेमिनारमधील विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी विकसित केलेल्या ‘Meditation App’चे सादरीकरण होय. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने मानसिक आरोग्य आणि तणाव व्यवस्थापनासाठी तयार करण्यात आलेल्या या ॲपची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या या नाविन्यपूर्ण प्रकल्पाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.त्यानंतर उपग्रह मॉडेल निर्मिती कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाच्या समन्वयक प्रा. वंदना जाधवपाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. प्रियांका साह यांनी कार्यशाळेचे समन्वयन केले, तर पिल्लई HOCL एज्युकेशनल कॅम्पसचे Outreach Officer विकास राजपूत यांनी विद्यार्थ्यांना उपग्रहाची रचना, कार्यपद्धती, उपग्रह संप्रेषण, अवकाश मोहिमा आणि आधुनिक अवकाश तंत्रज्ञान याविषयी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने उपग्रहांची मॉडेल्स तयार करून प्रत्यक्ष अनुभव घेतला. विद्यार्थ्यांना Satellite Model Making Website ची माहिती देण्यात आली. सदर कार्यक्रमात एकूण 170 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.कार्यक्रमाच्या शेवटी पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला. विविध उपक्रमांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके व सहभाग प्रमाणपत्रे प्रदान करून गौरविण्यात आले.यावेळी देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. रवी पाटील यांनी अध्यक्षीय समारोप करताना विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, वैज्ञानिक संशोधन, नवोपक्रम आणि अवकाश संशोधनाचा स्वीकार करून भविष्यासाठी सज्ज व्हावे, असे आवाहन केले.उपप्राचार्य प्रा. अरुण काटे यांनी विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाचे, शिक्षकांच्या अथक परिश्रमांचे तसेच पिल्लई HOCL एज्युकेशनल कॅम्पसच्या टीमच्या मोलाच्या सहकार्याचे विशेष कौतुक केले. त्यांनी अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो, असे मत व्यक्त केले.या कार्यक्रमास विज्ञान शाखेचे पर्यवेक्षक डॉ. किरण पतंगे , प्रा. अनघा देशपांडे ,डॉ. राजन राजपूत आणि डॉ. कल्याण माळी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विज्ञान शाखेतील सर्व प्राध्यापक, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी नियोजन, समन्वय आणि अंमलबजावणीसाठी विशेष परिश्रम घेतले.

## घोडे दादा

घोडे दादा घोडे दादा
गाऊ किती तुझे गुणगान
धाडस व शोर्याचा
मिळाला तुला बहुमान

ऐटीत चालतोस
रूबाब तुझा न्यारा
वेगाने पळतांना
मागे टाकतोस वारा

टप टप टापा टाकतांना
पाहतात तुला सारी
तुझ्यावर स्वार होण्याची
मजाच असते न्यारी

नवरदेवाच्या मिरवणूकीत
सजतोस तू छान
बॅन्डच्या तालावर नाचतोस
हरपून देहभान

धैर्य व निष्ठा बाळगून
चोख बजावतोस काम
सतत उभा राहतोस
कधी करतोस आराम?




**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**


## चाळीसगाव येथील मोडी लिपी प्रशिक्षण शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; ६० विद्यार्थ्यांची नोंदणी



**कन्नड (अरुण थोरात) :** नानासाहेब यशवंतराव चव्हाण कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चाळीसगाव येथील इतिहास विभाग व पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोडी लिपी प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन छ. शिवाजी महाराज व शिक्षणमहर्षी नानासाहेब यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटक म्हणून मोडी लिपी अभ्यासक मा. अमोल मोहळकर उपस्थित होते, तर उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय सहकारी शिक्षण प्रसारक मंडळ लिमिटेड, चाळीसगावचे सचिव आबासाहेब बाळासाहेब विश्वासराव चव्हाण होते. प्रास्ताविकात इतिहास विभागाचे प्रा. कल्पतेश देशमुख यांनी मोडी लिपीचे महत्त्व स्पष्ट करत इतिहास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. सदर प्रशिक्षण वर्ग ३० जुलै ते ८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत चालणार असून, दि. ९ ऑगस्ट रोजी प्रशिक्षणार्थींची परीक्षा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच उपस्थित प्रमुख पाहुण्यांचा परिचयही करून दिला.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. डी. देशमुख यांनी आपल्या मनोगतात इतिहास विभागाने सातत्याने राबविलेल्या उपक्रमांचे कौतुक करून अशा प्रशिक्षणांमुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहास संशोधनाची आवड निर्माण होत असल्याचे सांगितले. उद्घाटनपर भाषणात मा. अमोल मोहळकर यांनी मोडी ही भाषा नसून लिपी असल्याचा सर्वसामान्यांमधील गैरसमज दूर केला. इ.स. १२ व्या शतकापासून मोडी लिपीचा वापर सुरू असून हेमाद्री पंडित तिचे जनक मानले जातात. शिवकालात व पुढे अठराव्या शतकापर्यंत मोडी लिपीचा मोठ्या प्रमाणावर वापर झाला. मुघलकालीन राज्यकारभार उर्दू व फारसी भाषेत होत असताना मराठी प्रशासनात मोडी लिपीचा प्रभावी वापर करण्यात आला. पेन न उचलता सलग लिहिता येणे हे मोडी लिपीचे वैशिष्ट्य असल्याचे त्यांनी सांगितले. शासनाकडे पेशव्यांच्या काळातील सुमारे चार ते पाच हजार मोडी दस्तावेज उपलब्ध असून, अडगळीत पडलेला इतिहास उजेडात आणण्यासाठी मोडी लिपीचे ज्ञान अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रशिक्षणाचा उद्देश मोडी लिपीचे शिक्षण घेऊन शासनमान्य प्रशस्तीपत्र प्राप्त करणे तसेच ऐतिहासिक दस्तावेजांचा अभ्यास करून इतिहासाचे दालन खुले करणे हा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात आबासाहेब बाळासाहेब विश्वासराव चव्हाण यांनी भारत हा बहुभाषिक देश असून प्रत्येक राज्याची स्वतंत्र भाषा व लिपी असल्याचे सांगितले. विविध लिप्यांचा इतिहास उलगडत त्यांनी देश-विदेशातील अनेक ठिकाणी, विशेषतः लंडन, स्पेन आदी ठिकाणीही मोडी लिपीतील ऐतिहासिक कागदपत्रांचा मोठा ठेवा उपलब्ध असल्याची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी मोडी लिपी आत्मसात करून ऐतिहासिक दस्तावेजांचा अभ्यास करावा आणि भारताचा खरा इतिहास जगासमोर आणावा, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी मंचावर आबासाहेब बाळासाहेब विश्वासराव चव्हाण, भरत गवळी, निलेश शिंदे, प्राचार्य डॉ. प्रकाश बाविस्कर, प्राचार्य डॉ. जी. डी. देशमुख, उपप्राचार्य प्रा. एम. एस. बेलदार तसेच उपप्राचार्या डॉ. पी. एस. पाडवी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. तनुजा पाटील व कु. श्रद्धा राजपूत यांनी केले, तर कु. गायत्री गोसावी हिने स्वागतगीत सादर केले. उपप्राचार्य तथा वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. एम. एस. बेलदार यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी उपप्राचार्य डॉ. पी. एस. पाडवी, उपप्राचार्य एम. एस. बेलदार, प्रा. कल्पेश देशमुख प्रा. आदर्श मिसाळ व इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या मोडी लिपी प्रशिक्षण शिबिरासाठी सुमारे ६० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून विद्यार्थ्यांकडून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०१ ऑगस्ट २०२६


## शब्दात मी माझ्या बारूद भरतो आहे

आता शब्दात मी माझ्या, बारूद भरतो आहे.
झोपलेल्या समाजाला,पुन्हा जागे करतो आहे.

माया मोहात अडकून,झोपेचे सोंग का घेतले?
उठा! माझ्या भावंडानो,देश आता पेटले आहे.

असे कसे गाढ झोप,तुम्हाला आता लागली.
आता वेळ जागण्याची,भावांनो आली आहे.

पेटलेला देश पाहून,कशाला करता ढोंग.
देशात पेटलेले धग,घरापर्यंत येणार आहे.

पेटलेला वणवा भावा, तुझ्या घरापर्यंत येईल.
तुझा ही त्यात बळी,खुशाल घेणार आहे.

अजूनही गेली नाही वेळ,आता तरी जाग!
नाहीतर आगीत या,तुझेही घर जळणार आहे.

विझू देणार नाही माझ्या, शब्दातले निखारे.
शब्द शब्द पेटवून,सर्वांना जागे करतो आहे.

जात धर्म विसरून,आता मित्रा देशासाठी जाग.
सर्वांच्या भल्यासाठी,शब्दांचे दीप लावतो आहे.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## रात्री अकरापर्यंत बैठका... सकाळी सातला रुग्णालयात हजेरी; सुनेत्रा पवारांच्या 'ॲक्शन मोड'ने बीडला दिला नवा विश्वास



**बीड (भगवंत पाळवदे) :** घड्याळाच्या काट्यांनी रात्री अकरा वाजल्याचे सांगितले, तरी गुरुवारी बैठका सुरूच होत्या. प्रशासनाशी विकासकामांचा आढावा, लोकप्रतिनिधींसोबत चर्चा, नागरिकांच्या अडचणी... आणि अवघ्या काही तासांच्या विश्रांतीनंतर शुक्रवारी सकाळी नेमके सात वाजता उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार जिल्हा रुग्णालयाच्या परिसरात दाखल झाल्या. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या 'ॲक्शन मोड'ने त्यांनी खऱ्या अर्थाने बीडचे पालकत्व स्वीकारण्याची भावना बीड करांच्या मनात दाटून आली आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वतःहून बीड जिल्ह्याचे पालकमंत्रीपद स्वीकारले होते. त्यानंतर ज्या झपाट्याने त्यांनी विकासकामांना गती दिली, मोठ्या निधीला मंजुरी मिळवून दिली आणि प्रशासनाला कामाला लावले, त्यामुळे बीडकरांच्या अपेक्षा उंचावल्या होत्या. त्यांच्या अकाली निधनानंतर हा विकासाचा वेग कायम राहील का, सुरू असलेल्या कामांचे काय होईल, अशी चिंता अनेकांच्या मनात होती.मात्र सुनेत्रा अजित पवार यांच्या दोन दिवसांच्या दौऱ्याने त्या चर्चांना नवी दिशा मिळाली आहे. गुरुवारी सलग बैठका घेऊन रात्री जवळपास अकरा वाजेपर्यंत विकासकामांचा आढावा घेतल्यानंतर त्यांनी नागरिकांच्या अडचणीही ऐकून घेतल्या. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी पहाटे सात वाजता जिल्हा रुग्णालयात पोहोचून आरोग्य सेवांची पाहणी, सुरू असलेल्या कामांचा आढावा आणि अधिकाऱ्यांना दिलेल्या स्पष्ट सूचनांतून त्यांनी कामालाच सर्वोच्च प्राधान्य असल्याचा संदेश दिला.या दौऱ्यामुळे जिल्ह्यात अशी भावना व्यक्त होत आहे की, बीडच्या विकासाचा धागा तुटू दिला जाणार नाही. सुनेत्रा पवार यांनी केवळ पालकमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारलेली नाही, तर ती कृतीशील आणि परिणामकारक पद्धतीने पार पाडण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्या कामाच्या झपाट्यामुळे बीडकरांच्या अपेक्षांना पुन्हा नवी पालवी फुटल्याचे बोलले जात आहे.अजित पवार यांनी दाखवून दिलेल्या विकासाच्या वाटेवर आता सुनेत्रा पवार त्याच तळमळीने पुढे जात असल्याचे चित्र या दोन दिवसांच्या दौऱ्यातून स्पष्टपणे समोर आले. त्यामुळे बीडच्या विकासाला पुन्हा वेग मिळेल, अशी आशा जिल्ह्यात अधिक दृढ होताना दिसत आहे

## स्व. अजितदादांच्या स्वप्नातील बीड चे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्वांची साथ हवी- उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

**बीड (भगवंत पाळवदे) :** बीड जिल्ह्याच्या विकासासाठी निधीसह प्रशासन पातळीवरील प्रयत्न कुठेही कमी पडू दिले जाणार नाहीत अशी ग्वाही देतानाच स्व. अजितदादांच्या स्वप्नातलं बीड आणि त्याचा विकास पूर्ण करण्याचे अभिवचन मी देते, असे राज्याच्या उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले. त्याचबरोबर स्व. अजित दादांचे बीड जिल्ह्याच्या विकासाचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधींनी मला साथ द्यावी, असे भावनिक आवाहनही त्यांनी यावेळी केले. त्यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन समितीची सभा पार पडली यामध्ये 2026-27 या वर्षासाठी 623 कोटी रूपयांच्या आराखड्यास मंजुरी देण्यात आली.आज येथील जिल्हाधिकारी कार्यालयात नियोजन भवन सभागृहात ही सभा झाली. यावेळी पर्यावरण व हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, खासदार बजरंग सोनवणे, सर्वश्री आमदार विक्रम काळे, सतीश चव्हाण, प्रकाश सोळंके, धनंजय मुंडे, संदीप क्षिरसागर, सतीश चव्हाण, विजयसिंह पंडीत, सुरेश धस, विक्रम काळे, नमिता मुंदडा, बसवराज पाटील, सचिव डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, जिल्हा नियोजन अधिकारी शीला मिसाळ आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते. जिल्हा वार्षिक योजनेचा आराखडा बनवताना दादांनी दिलेल्या सूचना पुढेही सुरू ठेवाव्यात असे निर्देश देण्यात आले. याबाबतचे सविस्तर सादरीकरण या सभेत झाले.या सूचनांप्रमाणे कोणतेही काम 15 लाख रूपयांपेक्षा कमी असता कामा नये. एकाच कामाचे तुकडे करून स्वतंत्र अंदाजपत्रके दिल्यास त्याला मान्यता प्रदान केली जाणार नाही. ही एक महत्त्वाची सूचना आहे.जिल्हा नियोजनात जिल्हा परिषद आणि इतर यंत्रणांना जो निधी दिला जातो त्याचा योग्य प्रकारे विनियोग करून लोकांच्या विकासासाठी प्रयत्न असावेत. असेही सांगण्यात आले आहे. विकासकामात पारदर्शकता व आर्थिक शिस्त महत्त्वाची आहे. तसेच नियोजन करताना ही कामे प्रशासनाची गरज आणि लोकप्रतिनिधींची मागणी याचा समन्वय राखणारी असावी, अशा सूचना श्रीमती पवार यांनी या बैठकीत दिल्या.आजच्या सभेत सुरुवातीला पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते स्व. खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती 2026 स्पर्धेसाठी तयार करण्यात आलेला लोगो आणि शुभंकरचे अनावरण करण्यात आले. तसेच त्यांनी स्पर्धेच्या पुर्व तयारीचा आढावाही यावेळी घेतला.श्रीमती पवार म्हणाल्या की, बीड जिल्ह्याला वारकऱ्यांचा वारसा आहे. जिल्हा बीडच्या विकासासाठी दादांनी केलेले नियोजन सर्व लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या विचारातून, भुमिकेतून दिसून आले आहे. सर्व लोकप्रतिनिधींनी त्यांच्या मतदार संघात आवश्यक कामांसाठी केलेल्या निधी तरतूदीचा जिल्हाधिकारी यांनी नियोजनात समावेश करावा, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.तसेच आमदार धनंजय मुंडे, सुरेश धस यांच्यासह व इतर लोकप्रतिनिधींनी जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांच्या विविध समस्या व ऊसतोड कामगार महामंडळाच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित केले. त्याबाबत मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच लोकप्रतिनिधींच्या इतर सर्व सुचनांवर संबंधित विभागाच्या मंत्र्यांसह बैठक घेऊन प्रश्न सोडविले जाणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. त्याचबरोबर आपले घर, समाज आणि आपल्या जिल्ह्याचा अभिमान राखला जाईल यासाठी सर्वांनी दक्षता घेण्याचे, आवाहनही त्यांनी यावेळी केले. आमदार धनंजय मुंडे यांनी मागील वर्षीच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसाठीचा निधी, ग्रामीण विकास निधी, रस्ते विकास, परळी तालूक्यातील धर्मापूरी येथील पुरातन मंदिर विकासासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून निधीची तरतूद करण्याची मागणी केली.मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांची काम करण्याची पध्दत स्व. दादाप्रमाणेच आहे. बीड ऊसतोड कामगार कष्टकरी, वारकरी लोकांचा जिल्हा आहे. जिल्ह्याच्या सर्व लोकप्रतिनिधींनी येथील शाळा, स्मशानभूमी रस्ते, यासारख्या मुलभूत, पायाभूत सुविधांचा विकास करण्याचा प्रयत्न करावा. लोकप्रतिनिधी सोबतच प्रशासनानेही जनताभिमूख राहून जिल्ह्याच्या विकासासाठी प्रयत्न करावा, असेही त्या यावेळी म्हणाल्या.खासदार बजरंग सोनवणे यांनी जिल्ह्यातील रस्त्यांच्या जोडणी, दुरुस्तीसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देणे, पाणी पुरवठा योजनेच्या कामात बोगस रक्कम उचलण्यावर सबंधितांवर कारवाईची मागणी केली. एमएसीबी लाईनमुळे मृत्यू झालेल्यांना मदत देणे, शेतकऱ्यांना पीक कर्जात सवलतीच्या दरात 3 लाखांवरुन 7 लाखांपर्यंत मर्यादा वाढविण्याची विनंती केली. त्याचबरोबर तलाठी, ग्रामसेवकांनी गावात राहणे, ऊसतोड कामगारांच्या समस्या घरकुल लाभार्थी यांच्या समस्यांकडे लक्ष वेधले.आमदार विक्रम काळे यांनी, पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या कार्यपध्दतीला खंबीर पाठिंबा असल्याचे सांगत 435 गावातील प्रत्येक मतदार संघात स्मशानभूमी झाली पाहिजे त्यासाठी जागेची तरतूद करावी, अशी सूचना केली.आमदार नमिता मुंदडा, शेतकऱ्यांसाठी फार्मर आयडी भरणे सुलभीकरण, डिपीडिसीमधून सर्व रुग्णालयासाठी औषध खरेदीसाठी आधिकची मागणी केली. तसेच मागील वर्षीचा थकित निधी मिळावा मुलींना कॅन्सर रोखण्यासाठी देण्यात येणाऱ्या HPV लसींबाबत जाणिव जागृती करण्यात यावी, अशी सूचना मांडली.आमदार विजयसिंह पंडित यांनी मागील वर्षीच्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी तरतूद करणे तसेच संबंधित विभागात हातपंप दुरुस्ती होण्यासाठी रिक्त जागा तातडीने भरण्याची सूचना केली.आमदार प्रकाश सोळंके यांनी ग्रामीण भागातील रस्त्यांवरील पुलांची दयनीय अवस्था, धारूर साठी सीसीटीव्ही उपलब्धतेसाठी निधी, जिल्ह्यात विविध उद्योग आणण्यासाठी तसेच सीएसआर फंड मिळण्यासाठी प्रयत्न करण्याची सूचना केली.आमदार संदीप क्षीरसागर यांनी जिल्ह्यात मराठा भवन उभारणे तसेच मुलींसाठी वसतीगृह उभारण्यासाठी तरतुद करण्याची सूचना केली.आमदार सुरेश धस जिल्ह्यातील दुध उत्पादक, जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता कुकुटपालन निधी यासारख्या विविध विशेष घटक योजना अंतर्गत निधीच्या प्रस्तावांकडे लक्ष देण्याची सूचना केली. ठळक तरतुदी

पशुसंवर्धन अंतर्गत कृत्रिम रेतनकेंद्र इमारत बांधकाम 5.27 कोटीची मान्यता

पशुपैदास प्रक्षेत्र साकूड येथे पाणीपुरवठा योजना 2.99 कोटी 18 पशुवैद्यकीय दवाखाना बांधकाम व दुरूस्ती 4.89 कोटी

जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन जिल्हा परिषद साठी विशेष निधी 2025-26 मध्ये वन विभागामार्फत 475.4 हेक्टर क्षेत्रावर वृक्षलागवड झाली. येत्या काळात आणखी 263.30 हेक्टर वर वृक्षलागवडीचे उद्दिष्ट हरित बीड वृक्ष लागवड अंतर्गत यंदा 65 लाख 49 हजार वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ग्रामपंचायत जनसुविधेसाठी 37.53 कोटी विशेष अनुदान यात प्रामुख्याने 91 ठिकाणी स्मशानभूमी शेड बांधकाम आणि ग्रामपंचायत इमारत बांधकाम उर्जा विकास अंतर्गत विविध 61 कार्यालयात अपारंपारिक ऊर्जा साधन विकास अंतर्गत 12 कोटी मंजूर


बीड जिल्हा ग्रंथालय इमारत बांधकाम 2 कोटीची मान्यता एकूण आराखडा 4.95 कोटी रूपयांचा कंकालेश्वर मंदिर विकासासाठी 11.21 कोटींची तरतूद

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०१ ऑगस्ट २०२६


## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती दिना निमित्त शासनाच्या 'लेखन प्रेरणा दिन' साजरा करण्याच्या सूचना




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** राज्य सरकारच्या वतीने महाविद्यालयातून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त 'लेखन प्रेरणा दिन' साजरा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ग्रंथदिंडी, व्याख्याने,शाहिरी, मुलाखत यासह विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या अलौकिक प्रतिभेने मराठी साहित्य विश्वात क्षेत्रात अमूल्य आणि भरीव योगदान दिले आहे.लेखनीचा प्रभाव आणि श्रमिक कष्टकरी कामगार यांच्या साठी आंदोलने करीत स्व:प्रतिभेच्या बळावर सातासमुद्रापार एक लढवय्या साहित्यिक म्हणून नावलौकिक मिळविला.अशा जागतिक कीर्तीचे प्रतिभासंपन्न साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांच्या या योगदानाचे स्मरण आजच्या युवा पिढीला व्हावे यासाठी १ ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिवस लेखन प्रेरणा दिन म्हणून सार्वत्रिक पणे साजरा करण्यात यावा अशा सूचना परिपत्रक काढून करण्यात आल्या आहेत. मराठी जनमानसात ही लेखन प्रेरणा पोहोचली पाहिजे.यातून नव लेखक घडावेत त्यांना या निमित्ताने लिहण्याची वाचनाची प्रेरणा मिळावी.अशी शासनाची भूमिका असल्याचे कळविण्यात आले आहे.त्या अनुषंगाने एक ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिवस लेखन प्रेरणा दिन म्हणून उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारित सर्व विद्यापीठे, महाविद्यालये,अन्य संलग्नित संस्था या माध्यमातून विविध उपक्रम साजरे केले जाणार आहेत.चौकट :लेखन प्रेरणा दिन विद्यार्थ्यांना विविध विषय देऊन त्यांचे कडून कथा, कविता, निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करणे. विविध विषयांवर वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करणे. साहित्यिकांच्या मुलाखती, व्याख्याने आयोजित करणे. ० ग्रंथदिंडी आयोजित करुन ग्रंथ लेखन, वाचन यांचे महत्त्व विशद करणे.फलकाच्या माध्यमातून संदेश देणे. ० लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्या,कथा, पोवाडे , कविता,गीते , लोकनाट्य, आदी विद्यार्थ्यांना वाचन करावयास सांगणे. ० साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यावर आधारित चर्चासत्रे,परिसंवाद, कार्यशाळा तसेच साहित्य संमेलनाचे आयोजन करणे.मराठवाडा साहित्य परिषद, उमरगा शाखेतील पदाधिकारी सदस्य साहित्यिक या कामी शाखा पातळीवर विविध उपक्रमांचे आयोजन करणार अशी माहिती प्रा.किरण सगर अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा माजी उपाध्यक्ष मराठवाडा साहित्य परिषद, संभाजीनगर तसेच उमरगा शाखाध्यक्ष प्रदीप पाटील आणि कार्यवाह गुंडू दुधभाते यांनी दिली आहे.

## १८ वर्षांपर्यंतच्या सर्वच बालकांवर मोठ्या शस्त्रक्रिया आता मोफत

**बीड / अंबाजोगाई (भगवंत पाळवदे) :** शुन्य ते १८ वयोगटातील सर्वच बालकांवर मोठ्या स्वरुपाचे उपचार मोफत देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाचा 'राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम'(आरबीएसके) कार्यान्वित करण्यात आलेला आहे. या 'आरबीएसके' अंतर्गत पुण्यात काशीबाई नवले हॉस्पिटल आणि पिंपरी चिंचवड येथील आदित्य बिर्ला हॉस्पिटल येथे बालकांच्या मोठ्या शस्त्रक्रिया मोफत होणार आहेत. याबाबतचा करार राज्य कुटूंब कल्याण कार्यालयाने नुकताच हॉस्पिटलसोबत केला आहे. यामुळे बालकांसाठी खाजगी हॉस्पिटलमध्ये लाखो रुपये खर्च करण्याची गरज पालकांना आता नाही.या करारानुसार शुन्य ते १८ वयोगटातील बालकांसाठी न-हे येथील काशीबाई नवले हॉस्पटलमध्ये जन्मजात हृदयरोग (कंजेनायटल हर्ट डिसिज), अस्थिरोग शस्त्रक्रिया, प्लास्टिक सर्जरी, मेंदूची शस्त्रक्रिया (न्युरो सर्जरी), दातांची शल्यचिकित्सा (डेंटल सर्जरी), कानाचे उपचार (इएनटी) आणि डोळ्यांचे उपचार (आप्थॉल्मालॉजी) मोफत होणार आहेत.आदित्य बिर्ला हॉस्पिटलमध्येही प्लास्टिक सर्जरी (फाटलेली, दुभंगलेली टाळू), -हदयशल्यचिकित्सा, अस्थिरोग शस्त्रक्रिया (ऑर्थोपेडिक सर्जरी), मेंदूची शस्त्रक्रिया (न्युरो सर्जरी), दातांची शस्त्रक्रिया (डेंटल सर्जरी), ऐकु येण्यासाठी क्वाक्लिअर इंप्लांट आणि डोळ्यांचे उपचार. हे उपचार केले जाणार आहेत. हे उपचार झाल्यावर त्याचे पैसे आरबीएसकेने ठरवलेल्या दरांनूसार देण्यात येणार आहेत. पुण्यासह नाशिक, वर्धा आणि मुंबईतही यासाठी हॉस्पिटल देण्यात आले आहेत. तेथेही उपचार होतील. नाशिक येथे सुयोग हॉस्पिटल व चोपडा मेडिकेअर ॲण्ड रिसर्च सेंट, मुंबईतील कोकिलाबेन धीरुभाई अंबानी हॉस्पिटल आणि वर्धा येथे आचार्य विनोबा भावे रुरल हॉस्पिटल यांचा समावेश आहे. धीरुभाई अंबानी हॉस्पिटलमध्ये जन्मजात हृदयरोगावर उपचार होतील तर इतर हॉस्पिटलमध्ये नेहमीप्रमाणे -हृदयरोगासह इतरही उपचार होतील

## उपमुख्याध्यापक राधाकृष्ण कोंढारे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा उत्साहात




**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** उमरगा तालुक्यातील मुरूम येथील प्रतिभा निकेतन माध्यमिक विद्यालयाचे उपमुख्याध्यापक राधाकृष्ण कोंढारे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त सेवापूर्ती गौरव सोहळा शुक्रवारी (दि. ३१ जुलै) उत्साहात पार पडला.शैक्षणिक क्षेत्रात तब्बल ३४ वर्षे उल्लेखनीय सेवा बजावल्यानंतर कोंढारे सर सेवानिवृत्त झाले. सन १९९२ मध्ये शिक्षक म्हणून सेवेला सुरुवात केलेल्या कोंढारे यांना २०२५ मध्ये उपमुख्याध्यापकपदी पदोन्नती मिळाली होती. आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात त्यांनी अनेक गुणवंत विद्यार्थी घडवून शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य उल्हास घुरघुरे होते. यावेळी बोलताना त्यांनी, "जीवनात प्रामाणिकपणे व निष्ठेने काम करणाऱ्या व्यक्तीला त्याचे योग्य फळ मिळते. राधाकृष्ण कोंढारे यांनी संस्थेत अत्यंत प्रामाणिकपणे सेवा बजावली असून, त्यांचा आदर्श इतरांनी घ्यावा," असे प्रतिपादन केले. यावेळी कोंढारे सरांनीही सेवाकाळातील आठवणींना उजाळा देत सर्वांचे आभार मानले.यावेळी उपप्राचार्य उमाकांत महामुनी, पर्यवेक्षक विवेकानंद पळसाळगे, नूतन विद्यालयाचे मुख्याध्यापक राजशेखर कोरे, प्रल्हाद काळे यांच्यासह प्रा. अण्णाराव कांबळे, प्रा. सुधीर नाकाडे, प्रा. नारायण सोलंनकर, प्रा. विश्वजीत अंबर, प्रा. राघवेंद्र धर्माधिकारी, प्रा. बिभीषण बंडगर, प्रा. दयानंद राठोड, प्रा. अमोल गायकवाड, प्रा. रत्नदीप वाकडे, प्रा. सलीम जमादार, प्रा. अजित राठोड, प्रा. दीपक सांगळे, प्रा. सरस्वती तपसाळे, प्रा. माधुरी नरगिडे, बालाजी बिंदे, शिवशरण तांबडे, संतोषकुमार सूर्यवंशी, महावीर भोजने, मल्लिनाथ चव्हाण, हेमंत आकुसकर, शिवानंद जेऊरे, महावीर हुग्गे आदी शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाहीन तांबोळी, प्रास्ताविक रविकांत स्वामी यांनी तर पवन पाटील यांनी आभार मानले.




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०१ ऑगस्ट २०२६

# भिक नको घेऊ घामाचे दाम

आजपर्यंत रक्त आणि अश्रू गोठून
आम्ही पेरीत आलो ही सारी रानं
गाळीत आलो घाम ऊर फुटेस्तोवर
तरीही आमच्या कपाळावरील
दारिद्र्याचा शिक्का पुसला गेला नाही

आम्ही पीकवत गेलो , तुम्ही खात गेलात
आमच्या वाट्याला कायम उपेक्षाच आली
आम्ही मुकपणे भोगत आलो
तुमची गावाशिवारातील दहशत......

हाता पायात अदृश्य बेड्या ,
नाकात कायमच्या करकचटून
आवळलेल्या यसनी ....
तरिही आम्ही तुडवित आलोय
या रक्ताळलेल्या काटेरी पायवाटा ......

आमच्या बापजांद्यानी लढाया केल्या
किल्ले जिंकले अन तुम्ही सत्तेत आलेत
मग सगळीच सिंहासने आपल्याच वाटयाला
आम्हीही डोळे झाकून तुमच्या पदरात कायमचे
मताचे दान टाकत आलोय

आपलीच रक्तामासाची
वंचिता विषयीचा कळवळा असणारी माणसं म्हणून
आज आपलीच म्हणवणारी शेतकऱ्यांची मुलं
सिंहासनावर आरूढ आहेत ....
पावलो पावलो तेही डंका वाजवतातच
आणि अभिमानाने सांगतात आम्ही शेतकरी पुत्र
असल्याचे .....

तरिही आमच्या दारिद्र्य आणि दु:खाची जाणीव न ठेवता
आमच्या ओल्या जखमीवर मीठ चोळत असतात ....
वर्षोनूवर्ष.......

आमच्या कपाशीला ....
सोयाबीनला ....
दुधाला .......
ऊसाला .....
कशालाच .... भाव नाही ....

तरिही तुम्ही चिडीचिप .....
आम्ही काहीच बोलू नये ...
लढू नये म्हणून सारी व्यवस्था पोषक करून ठेवली ....
सोबतीला आमच्या तोंडाला अदृश्य मुंगसे बांधले . ' .....

आता आम्ही कुणाच्या नावानं बोंब मारावी ......
कुणाला शिव्या घालाव्या ..... ?
तुम्हीच सांगा ......
आमच्या नाका तोंडातून पाणी जायची वेळ आली
तरिही तुम्ही दगडाच्या काळजाचे ......

आता आमचा न्याय आम्हालाच करावा लागेल
आमच्या न्याय हक्काची , जीवन मरणाची लढाई
आम्हालाच लढवावी लागेल ....
आमच्या अस्तित्वाच्या लढाईत ऊभे राहावे लागेल
एकजुटीने , एकदिलाने ठाम ...

आम्हाला आता भीक नको , घेऊ घामाचे दाम !

**डॉ . शिवाजी हुसे**

# टीईटी ही शिक्षकांच्या व्यवसायिक कौशल्यावर आधारित व्हावी - भाऊसाहेब चासकर



**छत्रपती संभाजीनगर :** स्मरणशक्ती आणि घोकंपट्टीवर आधारित सध्याची टीईटी परीक्षा ही शिक्षकांच्या गुणवत्तेचे वास्तव मूल्यमापन करू शकत नाही. त्यामुळे टीईटीऐवजी विद्यार्थीकेंद्रीत शैक्षणिक गुणवत्तेला प्राधान्य देणारी स्वतंत्र व्यवस्था विकसित करून व्यावसायिक कौशल्ये आणि मानकांच्या आधारे पात्रता निश्चित करावी. शिकवण्यासाठी आवश्यक असलेली गुणवत्ता आणि अध्यापन क्षमता टीईटीसारख्या पाठांतरावर आधारित परीक्षेतून मोजणे शक्य नाही. सर्वोच्च न्यायालयाने टीईटी सक्तीची भूमिका घेतली असली, तरी संसदेने शिक्षण हक्क कायद्यात दुरुस्ती करून ही सक्ती मागे घ्यावी. शिक्षकांच्या व्यावसायिक पात्रतेचे मूल्यमापन प्रत्यक्ष अध्यापन, विद्यार्थ्यांची प्रगती आणि व्यावसायिक कौशल्ये विकासावर करावे, असे मत शिक्षण अभ्यासक भाऊसाहेब चासकर यांनी व्यक्त केले. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने आयोजित शिक्षण विकास मंचच्या 'शिक्षण कट्टा' कार्यक्रमात ते बोलत होते. यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई विभागीय केंद्र छत्रपती संभाजीनगर, शिक्षण विकास मंच आणि श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था यांच्या वतीने ' शिक्षक पात्रता परीक्षा : सध्याचे स्वरूप आणि पुनर्रचना ' या विषयावर शिक्षण कट्टा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून शिक्षण अभ्यासक भाऊसाहेब चासकर यांची उपस्थिती होती. शिक्षण विस्तार अधिकारी रमेश ठाकूर, यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथील शिक्षण विभागाचे योगेश कुदळे, शिक्षण कट्ट्याचे समन्वयक डॉ रूपेश मोरे व्यासपीठावर उपस्थित होते.यावेळी भाऊसाहेब चासकर पुढे म्हणाले की, सध्याची शिक्षक पात्रता परीक्षा ही प्रामुख्याने सेवेत येऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी आहे. कार्यरत शिक्षकांना याची सक्ती करणे योग्य नाही. टीईटीमुळे शिक्षकांमध्ये असुरक्षिततेची आणि तणावाची भावना निर्माण झाली असून, याचा प्रतिकूल परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत आहे. त्यामुळे टीईटी परीक्षा हा केवळ शिक्षकांचा नव्हे, तर संपूर्ण प्राथमिक शिक्षण व्यवस्थेचा प्रश्न आहे. शिक्षकांना असणारी अशैक्षणिक कामे आणि प्रशिक्षण यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण वाऱ्यावर सोडले गेल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. शिक्षकांना दर्जेदार अध्यापनासाठी मानसिक सुरक्षितता आणि सन्मान मिळणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.शिक्षण विस्तार अधिकारी रमेश ठाकूर यांनी भाऊसाहेब चासकर यांचा परिचय करून दिला. योगेश कुदळे यांनी शिक्षण विकास मंचच्या कार्याची ओळख आपल्या भाषणातून करून दिली. नीलेश राऊत यांनी कार्यक्रमांचे प्रास्ताविक केले. डॉ रूपेश मोरे यांनी सूत्रसंचालन केले तर शिवाजी काकडे यांनी आभार मानले. यावेळी प्रा. सुहास पानसे, सुबोध जाधव, राजेश हिवाळे, उपप्राचार्य संजय गायकवाड, राहुल मोहनपुरकर, डॉ जिजा शिंदे, राजेंद्र वाळके, डॉ. विनोद सिनकर, योगेश्वर निकम, प्रा. नागेश अंकुश, द्वारकानाथ जोशी, स्वाती गवई, सुनील ढोके, रायभान जाधव आदींची उपस्थिती होती.



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०१ ऑगस्ट २०२६

# NEET चे खरे आव्हान : भ्रष्ट कारभार की संस्थात्मक अपयश ?




३ मे २०२६ रोजी, भारतातील पदवीपूर्व वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठीची राष्ट्रीय स्तरावरील सामायिक प्रवेश परीक्षा म्हणजेच 'नीट' (NEET) पार पडली. त्यानंतरच्या काही दिवसांत, सोशल मीडिया अशा विद्यार्थ्यांच्या रील्सने भरून गेला होता, जे अनेक महिन्यांच्या आणि वर्षांच्या अथक तयारीचा शेवट झाल्याचा आनंद साजरा करत होते. परंतु, जेमतेम दोन आठवड्यांनंतर या आनंदाचे रूपांतर घोर निराशेत झाले. १२ मे रोजी, भारतातील उच्च शिक्षण प्रवेश परीक्षा घेणारी मुख्य संस्था असलेल्या 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी'ने (NTA) नीट २०२६ परीक्षा रद्द करण्याची घोषणा केली. परीक्षेपूर्वीच एक "अंदाजित प्रश्नपत्रिका" (Guess Paper) मोठ्या प्रमाणावर फिरत असल्याच्या आणि मूळ परीक्षेत अनेक त्रुटी असल्याच्या आरोपांनंतर हा निर्णय घेण्यात आला. तेव्हापासून, या निराशेमुळे किमान चार विद्यार्थ्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले आहे. राजस्थानच्या सीकरमध्ये, २२ वर्षांच्या प्रदीप मेघवाल याने आपल्या राहत्या घरी आत्महत्या केली. गेली तीन वर्षे तो नीटची तयारी करत होता आणि यंदा त्याला देशातील एका नामांकित वैद्यकीय संस्थेत प्रवेश मिळण्याची पूर्ण खात्री होती. उत्तर प्रदेशच्या लखीमपूर खेरीमध्ये, २१ वर्षांच्या रितिक मिश्रा याने आपले जीवन संपवले. प्रवेश परीक्षेत उत्तीर्ण होण्याचा हा त्याचा तिसरा प्रयत्न होता, परंतु वर्षांची मेहनत अचानक वाया गेल्याने तो पूर्णपणे कोलमडला होता. दिल्लीच्या आझादपूरमध्ये, २० वर्षांची अंशिका पांडे हिने परीक्षेच्या रद्द होण्यामुळे लागलेल्या धक्क्याने जीव दिला. २०२५ मध्ये अवघ्या चार गुणांनी तिची प्रवेशाची संधी हुकली होती, त्यामुळे यंदा ती तिसऱ्यांदा परीक्षेला बसली होती. गोव्यात एका १७ वर्षांच्या मुलाने आत्महत्या केली. त्याने मागे सोडलेल्या चिठ्ठीत, हॉकी खेळण्याची स्वतःची आवड जपत स्पर्धा परीक्षांची तयारी करताना येणाऱ्या मानसिक दबावाचा उल्लेख केला होता. या दुर्दैवी घटना एका अशा व्यवस्थेतील गंभीर त्रुटींवर बोट ठेवतात, जिने गेल्या काही वर्षांत प्रश्नपत्रिका फुटणे (Paper Leaks) आणि परीक्षांमधील गैरव्यवहारांच्या माध्यमातून आपली संस्थात्मक अपयश वारंवार दाखवून दिले आहे. परीक्षा रद्द झाल्यामुळे थेट तब्बल २२.८ लाख विद्यार्थ्यांवर परिणाम झाला आहे; ज्यांची मेहनत वाया गेली असून त्यांचे भविष्य अचानक अंधारात सापडले आहे. या विद्यार्थ्यांमध्ये १३.३२ लाख—म्हणजेच सुमारे ५८ टक्के—महिला आहेत. हे सर्व विद्यार्थी केवळ ५९,४१६ जागांसाठी एकमेकांशी स्पर्धा करत होते. 'एनटीए' (NTA) एका राष्ट्रीय वादाच्या केंद्रस्थानी येण्याची ही पहिलीच वेळ नाही. २०२४ मध्ये नीट परीक्षा पार पडल्यानंतर लगेचच बिहार आणि झारखंडमध्ये प्रश्नपत्रिका फुटल्याचे वृत्त समोर आले होते, ज्यानंतर अनेकाना अटक करण्यात आली होती. निकाल जाहीर झाल्यावर तर संशय अधिकच बळावला, कारण अभूतपूर्व अशा ६७ विद्यार्थ्यांनी ७२० पैकी ७२० गुण मिळवून अव्वल स्थान पटकावले होते; आणि विशेष म्हणजे यातील अनेक विद्यार्थी एकाच परीक्षा केंद्रावरील होते. एनटीएने स्पष्टीकरण दिले की, काही केंद्रांवर विद्यार्थ्यांचा 'वेळ वाया गेल्याची' भरपाई म्हणून १५६३ उमेदवारांना 'कृपांक' (Grace Marks) देण्यात आले होते. याचा परिणाम असा झाला की, गणिताच्या नियमात न बसणारे ७१८ आणि ७१९ सारखे गुण विद्यार्थ्यांना मिळाले. कायदेशीर आव्हाने आणि जनतेच्या वाढत्या संतापानंतर अखेर सरकारने हे कृपांक रद्द केले. त्यानंतर, २३ जून २०२४ रोजी केवळ त्या प्रभावित झालेल्या १५६३ उमेदवारांसाठी पुन्हा मर्यादित परीक्षा घेण्यात आली. जुलै २०२४ मध्ये, भारताचे तत्कालीन सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने देशभरात पुन्हा संपूर्ण परीक्षा घेण्याची मागणी करणाऱ्या अनेक याचिकांवर सुनावणी केली. न्यायालयाने शेवटी असा निर्णय दिला की, जरी प्रश्नपत्रिका फुटली असली, तरी परीक्षा प्रक्रियेत कोणताही 'संरचनात्मक बिघाड' झाल्याचा पुरावा मिळालेला नाही. खंडपीठाने पूर्ण परीक्षा रद्द करण्यास नकार दिला आणि असे निरीक्षण नोंदवले की, असा निर्णय घेतल्यास लाखो विद्यार्थ्यांचे नाहक नुकसान होईल आणि देशाचे वैद्यकीय शैक्षणिक वर्ष पूर्णपणे विस्कळीत होईल. त्याच वेळी, न्यायालयाने एनटीएला एका वादग्रस्त भौतिकशास्त्राच्या प्रश्नासाठी दिलेले गुण काढून फायनल मेरिट लिस्ट सुधारण्याचे निर्देश दिले. या सुधारणेमुळे ७२० पैकी ७२० गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ६७ वरून थेट १७ वर आली. २०२४ च्या या वादानंतर, केंद्र सरकारने सीबीआय चौकशीचे आदेश दिले आणि एनटीएच्या परीक्षा पद्धतीमध्ये सुधारणा करण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली. जनतेच्या तीव्र आक्रोशानंतर, एनटीएचे तत्कालीन प्रमुख सुबोध कुमार सिंग यांना २२ जून २०२४ रोजी पदावरून हटवण्यात आले. तथापि, ऑक्टोबर २०२४ मध्ये त्यांची केंद्रीय पोलाद मंत्रालयात अतिरिक्त सचिव आणि वित्तीय सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आणि नंतर त्यांना छत्तीसगड या त्यांच्या मूळ केडरमध्ये परत पाठवण्यात आले. ते सध्या छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साय यांचे प्रधान सचिव म्हणून कार्यरत असून, त्यांच्याकडे राज्याच्या ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिवपदाचा अतिरिक्त प्रभारही आहे. अनेक निरीक्षकांच्या मते, प्रशासकीय रचनेतील हा प्रवास सनदी अधिकाऱ्यांचे पुनर्वसन आणि त्यांना वरिष्ठ पदे बहाल करण्याच्या प्रवृत्तीचे आणखी एक उदाहरण आहे. पुढील परीक्षा २१ जून रोजी निश्चित करण्यात आली असून, अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे की यासाठी विद्यार्थ्यांना पुन्हा नोंदणी करण्याची गरज भासणार नाही. दरम्यान, सीबीआय एका मोठ्या 'परीक्षा माफिया' नेटवर्कचा तपास करत आहे, जे राजस्थान, महाराष्ट्र आणि हरियाणासह अनेक राज्यांमध्ये कार्यरत असल्याचे बोलले जाते. या तपास प्रक्रियेत आतापर्यंत एका शिक्षकासह अनेक कोचिंग सेंटरच्या मालकांना अटक करण्यात आली आहे. या संस्थेत संरचनात्मक सुधारणा करण्यासाठी सरकारने एनटीएमध्ये चार वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांचा अंतर्भाव केला आहे, ज्यामध्ये दोन संयुक्त सचिवांचा समावेश असून ते आता या संस्थेत अतिरिक्त महासंचालक म्हणून काम पाहतील. एनटीएची स्थापना प्रामुख्याने उच्च शिक्षण प्रवेश परीक्षा पारदर्शक आणि सुरळीतपणे घेण्यासाठी एक स्वायत्त संस्था म्हणून करण्यात आली होती. मात्र, गेल्या काही वर्षांत तिचे काम एका सार्वजनिक सेवा देणाऱ्या संस्थेसारखे न राहता, आर्थिक नफा वाढवणारी आणि संस्थात्मक जबाबदारी टाळणारी संस्था या स्वरूपाचे झाले आहे. २०२३ च्या राज्यसभेच्या एका समितीच्या अहवालानुसार, या संस्थेने परीक्षा शुल्काच्या माध्यमातून हजारो कोटी रुपयांची कमाई केली, परंतु परीक्षांच्या आयोजनावर त्या तुलनेत खूप कमी खर्च केला; ज्यामुळे त्यांच्याकडे मोठी आर्थिक शिल्लक जमा झाली. ३१ जुलै २०२४ रोजी राज्यसभेत सादर केलेल्या एका लेखी उत्तरात, केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री सुकांत मुजुमदार यांनी २०१८ मधील स्थापनेपासून एनटीएच्या उत्पन्न आणि खर्चाची आकडेवारी मांडली, ज्यामध्ये या संस्थेने सहा वर्षांत ४४८ कोटी रुपयांचा नफा कमावल्याचे स्पष्ट झाले. 'ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशन'च्या राष्ट्रीय अध्यक्षा नेहा म्हणाल्या: "आपली संपूर्ण शिक्षण व्यवस्था पद्धतशीरपणे मोडीत काढली गेली आहे आणि तिच्या जागी एक अशी समांतर व्यवस्था आणली गेली आहे जी शिक्षणाकडे एक 'हक्क' म्हणून पाहत नाही, तर पैसा कमावण्याची एक 'संधी' म्हणून पाहते." त्या पुढे म्हणाल्या, "या बदलामुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटनांमध्ये थेट वाढ झाली आहे, विशेषतः कोटा सारख्या कोचिंग हबमध्ये जिथे लाखो विद्यार्थी परीक्षांच्या तयारीसाठी स्थलांतर करतात. परीक्षांचे केंद्रीकरण आणि सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेचा होत असलेला ऱ्हास यांमुळे विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबांवर प्रचंड मानसिक आणि आर्थिक ताण येत आहे. बेरोजगारी, महागाई आणि आर्थिक असुरक्षिततेच्या या काळात आपल्या मुलांचे भविष्य सुरक्षित व्हावे, या आशेने कुटुंबे आपल्या वार्षिक बचतीचा मोठा हिस्सा खाजगी कोचिंग क्लासेसवर खर्च करत आहेत." नेहा यांनी निदर्शनास आणून दिले की, कोचिंग सेंटर्सचा भ्रष्टाचार आणि पेपर लीक प्रकरणांमध्ये वारंवार सहभाग असल्याचे समोर आले आहे. "एनटीए बहुधा या संस्थांशी संगनमत करून काम करते. काहीही असले तरी, वारंवार फुटणाऱ्या प्रश्नपत्रिका या संस्थेचे अपयश सिद्ध करतात," असे त्या म्हणाल्या. उपलब्ध आकडेवारीनुसार, गेल्या दशकात राज्य आणि केंद्र पातळीवरील परीक्षांमध्ये प्रश्नपत्रिका फुटण्याच्या ७० ते ८९ घटना घडल्या आहेत. २०१८ मधील आपल्या स्थापनेपासून एनटीए किमान चार मोठ्या परीक्षा गैरव्यवहारांमध्ये अडकली आहे: नीट २०२६; यूजीसी-नेट २०२४ (जिथे परीक्षा संपल्याच्या २४ तासांच्या आत पेपर लीकच्या आरोपांमुळे ती रद्द करण्यात आली); नीट २०२४ (ज्यामध्ये स्थानिक पातळीवर पेपर लीक झाल्याचे अधिकाऱ्यांनी मान्य केले); आणि जेईई २०२१ (जिथे एका संघटित टोळीने रिमोट-ॲक्सेस सॉफ्टवेअरचा वापर करून विद्यार्थ्यांचे कॉम्प्युटर्स हॅक केले होते). जेएनयू (JNU) च्या शैक्षणिक अभ्यास केंद्रात शिकवणारे प्रा. सुरेश बाबू यांनी एका मजबूत उत्तरदायित्व यंत्रणेच्या गरजेवर भर दिला. ते म्हणाले, "सरकार आपली जबाबदारी सामान्य जनतेवर ढकलून मोकळे होऊ शकत नाही. विशेषतः भ्रष्टाचाराच्या मुद्यांवर सरकार उत्तरदायी असलेच पाहिजे. परीक्षा पद्धतीवरील जनतेचा विश्वास उडाल्यास भारतातील शिक्षण आणि लोकशाहीच्या भविष्यावर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. तरुण पिढी आणि राज्यसंस्था यांच्यातील वाढती विश्वासाची दरी ही विद्यार्थी आजच्या संस्था, प्रशासन आणि गुणवत्तेकडे कशा प्रकारे पाहतात हे ठरवत आहे. परीक्षांमधील सातत्यपूर्ण वाद आपल्या राजकीय आणि शैक्षणिक व्यवस्थेबद्दल संशय वाढवत आहेत. बांगलादेश आणि नेपाळ सारख्या शेजारील देशांमध्ये तरुणांच्या अशाच प्रकारच्या असंतोषामुळे झालेल्या आंदोलनांचा विचार करता, आपण अत्यंत सावध राहण्याची गरज आहे.“ १५ मे रोजी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी जाहीर केले की, २०२७ पासून नीट-यूजी परीक्षा पूर्णपणे कॉम्प्युटर-आधारित केली जाईल. मात्र, चिकीत्सकांचे म्हणणे आहे की अशा निर्णयामुळे ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या मागास कुटुंबांतील विद्यार्थ्यांना अधिक तोटा सहन करावा लागू शकतो, कारण त्यांच्याकडे पुरेशी डिजिटल साधने उपलब्ध नाहीत. शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत असणाऱ्या 'युनिफाइड डिस्ट्रिक्ट इन्फॉर्मेशन सिस्टम फॉर एज्युकेशन'च्या २०२४-२५ च्या अहवालानुसार, भारतातील केवळ ६० टक्के सरकारी शाळांमध्ये कॉम्प्युटर्स उपलब्ध आहेत, तर फक्त ५८ टक्के शाळांमध्ये इंटरनेट कनेक्टिव्हिटी आहे. सर्वांना समान संधी देण्याऐवजी, हा प्रस्तावित बदल शहरी-ग्रामीण आणि श्रीमंत-गरीब यांच्यातील दरी अधिक रुंदावणारा ठरेल. नालसार (NALSAR) युनिव्हर्सिटी ऑफ लॉ चे माजी कुलगुरू फैझान मुस्तफा यांनी कॉलेज प्रवेश परीक्षांच्या तात्काळ विकेंद्रीकरणाची मागणी केली आहे. त्यांच्या मते, केंद्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या परीक्षा केवळ सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम वर्गाच्याच हिताच्या ठरतात. ते म्हणाले, "जेव्हा आपल्याकडे वेगवेगळ्या राज्यांमध्ये स्वतंत्र परीक्षा घेतल्या जात होत्या, तेव्हा आपण जगातील काही सर्वोत्कृष्ट डॉक्टर्स निर्माण केले. आपल्यासारख्या विशाल देशात किमान तीन, चार किंवा पाच वेगवेगळ्या परीक्षा असायला हव्यात, जेणेकरून जर एखाद्या विद्यार्थ्याची एक परीक्षा खराब झाली, तर त्याला दुसऱ्या परीक्षेत बसून आपले वर्ष वाचवण्याची संधी मिळेल." मुस्तफा यांनी परीक्षा रद्द झाल्यामुळे विद्यार्थ्यांवर होणाऱ्या मानसिक परिणामांबद्दलही तीव्र दुःख व्यक्त केले. त्यांच्या मते, नीट सारख्या परीक्षेत एक मूलभूत त्रुटी आहे: ही परीक्षा विद्यार्थ्याची भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयांची माहिती तपासत असली, तरी त्या विद्यार्थ्यामध्ये एक चांगला डॉक्टर बनण्यासाठी आवश्यक असणारी संवेदनशीलता, सहानुभूती किंवा व्यावहारिक कौशल्ये आहेत की नाही, हे तपासण्यात पूर्णपणे अपयशी ठरते. ते म्हणाले, "कोणत्याही क्षेत्रातील प्रवेश परीक्षा या उमेदवारांना केवळ पाठांतरावर आधारित तीव्र स्पर्धेच्या चक्रात अडकवण्याऐवजी, वैद्यकीय, विधी किंवा अभियांत्रिकी क्षेत्रासाठी आवश्यक असणाऱ्या प्रत्यक्ष क्षमतांचे मूल्यमापन करणाऱ्या असाव्यात.“ मुस्तफा यांनी मूळ समस्येवर थेट बोट ठेवले: "सर्व सामायिक प्रवेश परीक्षा या केवळ उच्चभ्रू वर्गाच्या फायद्याच्या असतात. जर मला कोचिंग क्लासेसचा खर्च परवडत असल, तर मी यशस्वी होईन. ग्रामीण भागातील आणि प्रादेशिक भाषांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना या व्यवस्थेत आपोआपच तोटा सहन करावा लागतो." तामिळनाडूमध्ये नीट परीक्षेमुळे वैद्यकीय प्रवेशांवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणाऱ्या 'राजन समिती अहवालाने' (२०२१) देखील अगदी याच निष्कर्षांवर शिक्कामोर्तब केले होते. आता एनटीएच्या कार्यपद्धतीत व्यापक सुधारणा करण्यासोबतच परीक्षांचे विकेंद्रीकरण करण्याची आणि भारताच्या एकूण शिक्षण व्यवस्थेचा पुनर्विचार करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. स्पष्ट आहे की, हे संकट केवळ प्रश्नपत्रिका फुटण्याच्या काही मोजक्या घटनांपुरते किंवा प्रशासकीय त्रुटींपुरते मर्यादित नाही; तर ते आपल्या शिक्षण व्यवस्थेतील सुलभता, समता आणि सार्वजनिक विश्वासाचा झालेला संपूर्ण संकुचितपणा दर्शवते. सरकारने सुचवलेले वरवरचे आणि तात्कालिक उपाय या संरचनात्मक समस्यांचा सामना करू शकत नाहीत, आणि म्हणूनच ते या संकटाचे कायमस्वरूपी निवारण करण्यात असमर्थ आहेत.


**वेदांत लखेरा: हे नवी दिल्लीतील 'फ्रंटलाईन' मासिकाचे पत्रकार असून ते दिल्लीच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशनचे माजी विद्यार्थी आहेत.**

**भाषांतर : प्रा. प्रियदर्शन भवरे, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना**

**साभार: फ्रंटलाइन**

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०१ ऑगस्ट २०२६

॥ रक्तदान श्रेष्ठदान ॥ ॥ रक्तदान श्रेष्ठदान ॥ ॥ रक्तदान श्रेष्ठदान ॥
गुरु मिश्री होमिओपॅथीक व आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय शेलगाव
यांच्या संयुक्त विद्यमाने
स्व.डॉ.शांतीलालजी देसरडा सर
यांच्या ७१ व्या जयंती निमित्त
* भव्य रक्तदान शिबीर *
* दि.०१ /०८/२०२६ * वेळ : सकाळी १० ते ३ वाजता
* स्थळ : मातोश्री बदामबाई मोतीलालजी देसरडा हॉस्पिटल शेलगाव
ता. बदनापूर जिल्हा जालना
रक्तसंकलन - जनकल्याण रक्तकेंद्र, जालना



स्व. प्राचार्य
डॉ. शांतीलालजी देसरडा सर
यांच्या ७१ व्या जयंतीनिमित्त
।। विनम्र अभिवादन ।।
तुमचे असणे आमच्यासाठी सर्व होते
ते आमच्या आयुष्यातील सुंदर पर्व होते
आज सर्व काही असल्याची जाणीव आहे
परंतु तुम्ही नाही ही सर्वात मोठी उणीव आहे.
शोकाकुल
प्राचार्य डॉ. हसन इनामदार आणि परिवार, छत्रपती संभाजीनगर.
देसरडा परिवार, छत्रपती संभाजीनगर.
गुरुमिश्री परिवार, शेलगांव, जालना.

# भरकटलेल्या तरुणाईला जागे करण्यासाठी संतविचारांची गरज

आजचा काळ विज्ञान तंत्रज्ञान कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जागतिकीकरणाचा आहे. माहितीचा स्फोट झाला आहे पण विचारांची समृद्धी कमी होत चालली आहे. शिक्षण वाढले पण संस्कारांचे अधिष्ठान ढासळत आहे. पैसा प्रसिद्धी आणि भौतिक सुखांच्या अंध स्पर्धेत माणूस स्वत:पासून कुटुंबापासून आणि समाजापासून दूर जात आहे. विशेषत: तरुण पिढी व्यसनाधीनता ऑनलाइन जुगार मोबाईलचे व्यसन हिंसक प्रवृत्ती गलिच्छ राजकारण जातीय द्वेष कौटुंबिक तणाव बेरोजगारी नैराश्य आणि सामाजिक असमतोल यांच्या विळख्यात अडकत चालली आहे. ग्रामीण भागातील अनेक तरुण शिक्षण रोजगार शेतीतील अनिश्चितता आणि आर्थिक संकटांमुळे निराशेच्या गर्तेत ढकलले जात आहेत. अशा वेळी महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा विचार हा केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक पुनर्जागरणाचा प्रभावी मार्ग आहे.संत ज्ञानेश्वरांनी विश्वबंधुत्वाची शिकवण दिली. पसायदान मधील त्यांची प्रार्थना आजही समाजासाठी दीपस्तंभ आहे.दुरितांचे तिमिर जावो. विश्व स्वधर्मसूर्ये पाहो.जो जे वांछील तो ते लाहो. प्राणिजात.या ओवीत अज्ञान द्वेष अन्याय आणि अहंकाराचा अंधार दूर होऊन प्रत्येकाने आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवावी अशी अपेक्षा आहे. आजच्या तरुणांनी स्वार्थाऐवजी समाजहिताचा विचार करावा हा या संदेशाचा गाभा आहे.पुढे तेच म्हणतात.भूतां परस्परे पडो. मैत्र जीवांचे.जात धर्म भाषा पक्ष आणि विचारधारा यांच्या नावाने निर्माण होणाऱ्या वैमनस्याच्या काळात ही ओवी माणसामाणसांत मैत्री सहिष्णुता आणि समतेचा संदेश देते. समाज जोडण्याची ताकद संतविचारांत आहे.संत तुकाराम महाराजांनी समाजातील दु:खी पीडित आणि वंचित माणसाच्या वेदनेला शब्द दिले.जे का रंजले गांजले. त्यांसी म्हणे जो आपुले.तोचि साधू ओळखावा. देव तेथेंचि जाणावा.आजचा तरुण जर समाजातील दुर्बल घटकांशी नाते जोडेल त्यांच्या वेदना समजून घेईल आणि समाजसेवेला जीवनमूल्य मानेल तर समाजात खरी परिवर्तनाची प्रक्रिया सुरू होईल.संत तुकाराम आत्मशुद्धीचे महत्त्व सांगताना म्हणतात.नाही निर्मळ जीवन. काय करील साबण.तैसी चित्तशुद्धी नाही. तेथे बोध करील काय.आज भ्रष्टाचार व्यसनाधीनता फसवणूक हिंसा आणि नैतिक अध:पतनाची मुळे मनातील अशुद्ध विचारांत आहेत. कायदे बदलून समाज बदलत नाही. मन बदलल्याशिवाय परिवर्तन घडत नाही. हा या अभंगाचा मूलार्थ आहे.पर्यावरणाशी माणसाचे नाते सांगताना संत तुकाराम म्हणतात.वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे.पक्षीही सुस्वरे आळविती.आज पर्यावरणाचा ऱ्हास पाणीटंचाई आणि हवामान बदल यांसारख्या संकटांवर उपाय शोधताना संतांनी शेकडो वर्षांपूर्वी दिलेला निसर्गप्रेमाचा संदेश अधिक महत्त्वाचा वाटतो.समर्थ रामदास स्वामी तरुणांना कृतीची प्रेरणा देताना म्हणतात.केल्याने होत आहे रे. आधी केलेच पाहिजे.तक्रार निराशा आणि निष्क्रियता यांत वेळ घालवण्याऐवजी प्रयत्न शिस्त परिश्रम आणि राष्ट्रकार्यासाठी स्वत:ला घडविण्याचा हा संदेश आजच्या तरुणाईसाठी अत्यंत उपयुक्त आहे.तेच पुढे सांगतात.सामर्थ्य आहे चळवळीचे. जो जो करील तयाचे.परंतु तेथे भगवंताचे. अधिष्ठान पाहिजे.सामर्थ्य नेतृत्व आणि संघर्ष यांना नैतिकतेची जोड नसेल तर ते विनाशाचे कारण ठरू शकते. त्यामुळे शक्तीबरोबर विवेक सेवा आणि चारित्र्यही आवश्यक आहे.संत एकनाथ महाराजांनी समतेचा आणि मानवतेचा मार्ग स्वीकारला. त्यांनी जातिभेद अस्पृश्यता आणि अहंकाराविरुद्ध आयुष्यभर संघर्ष केला. संत नामदेवांनी भक्तीबरोबर प्रेम नम्रता आणि सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. संत चोखामेळा यांनी उपेक्षित समाजाच्या वेदना भक्तीच्या माध्यमातून व्यक्त करून समतेचा आवाज बुलंद केला. संत सावता माळी यांनी श्रमाला पूजेसमान मानले. संत गाडगेबाबांनी स्वच्छता व्यसनमुक्ती अंधश्रद्धा निर्मूलन आणि समाजसेवा यांचा ध्यास घेतला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामविकास श्रमदान आणि राष्ट्रीय चारित्र्य यांचा पुरस्कार करून ग्रामीण भारताच्या उन्नतीचा मार्ग दाखवला.आज अनेक कुटुंबे कौटुंबिक कलह व्यसन वृद्धांचा अनादर आणि संवादाच्या अभावामुळे विस्कळीत होत आहेत. राजकारणात मूल्यांपेक्षा सत्तेला प्राधान्य दिले जात आहे. ग्रामीण भागात बेरोजगारी शेतकऱ्यांचे प्रश्न आणि आर्थिक असुरक्षितता वाढत आहे. अशा काळात संतविचार हे केवळ ग्रंथांत वाचण्याचे विषय नाहीत. तर ते जगण्याचे तत्त्वज्ञान आहे.शाळा महाविद्यालये कुटुंब कीर्तन वाचनमंडळे आणि सामाजिक संस्था यांनी संतवाङ्मय नव्या पिढीपर्यंत पोहोचवले पाहिजे. अभंग भारुडे प्रवचने आणि संतांचे चरित्र यांचा परिचय तरुणांना झाला तर त्यांच्यात विवेक संवेदनशीलता कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रप्रेम जागृत होईल.संतांचे विचार कोणत्याही एका धर्माचे किंवा पंथाचे नसून संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचा मार्ग आहेत. भरकटलेल्या तरुणाईला पुन्हा सामाजिक भान नैतिक अधिष्ठान आणि जीवनाची योग्य दिशा द्यायची असेल तर संतविचारांची कास धरणे ही काळाची सर्वात मोठी गरज आहे. विज्ञान आपल्याला प्रगतीचा मार्ग दाखवते. पण संतविचार त्या प्रगतीला माणुसकीची दिशा देतात. म्हणूनच आधुनिक भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी संतवाङ्मयाचे पुनर्वाचन आणि संतविचारांचे पुनरुज्जीवन ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे.आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने. शब्दांचीच शस्त्रे यत्न करू.



**शब्दांकन संदीप संगीता नानासाहेब वाकडे रा. खेडा ता. कन्नड छ. संभाजीनगर**
**९७६६९९२७७६**

# अभिजीत दीपके यांनी तथ्यांऐवजी दिशाभूल करू नये - भाजप जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे

**छत्रपती संभाजीनगर :** अभिजीत दीपके आंदोलनादरम्यान भाजपच्या कार्यकर्त्यांनी दगडफेक केल्याचा आरोप करत आहेत. जर तसे असेल आणि दिल्ली पोलिस संबंधित व्यक्तींचा शोध घेऊन कायदेशीर कारवाई करत असतील, तर त्या कारवाईला विरोध करण्याचे कारण काय? असा सवाल भाजपा जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी उपस्थित केला आहे. आंदोलनादरम्यान पोलिस कर्मचारी आणि पत्रकारांवर झालेले हल्ले, दगडफेक आणि हिंसाचार हे गंभीर स्वरूपाचे असून, त्याबाबत कठोर कारवाई व्हावी, अशी भूमिका घेण्याऐवजी आरोपींचे समर्थन केल्याचा आभास निर्माण करणारी विधाने अभिजीत दीपके करत असल्याचा आरोप शितोळे यांनी केला. हातात संविधान घेऊन बोलणाऱ्यांनी कायद्याचा सन्मान राखत हिंसाचार करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी करायला हवी होती. मात्र तसे न करता दिशाभूल करणारी भूमिका घेतली जात असल्याने त्यामागील हेतूबाबत जनतेच्या मनात प्रश्न निर्माण होत असल्याचेही ते म्हणाले. तसेच, अभिजीत दीपके काँग्रेसच्या भूमिकेशी सहमत नसतील, तर कर्नाटक आणि पंजाबमधील कथित पेपर लीक प्रकरणांबाबत संबंधित मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी ते कधी करणार, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. आंदोलनादरम्यान झालेल्या घोषणाबाजी, शिवीगाळ आणि त्यानंतर झालेल्या कथित जल्लोषाबाबतही दीपके यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी भाजपचे जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी केली.


महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०१ ऑगस्ट २०२६

# अण्णाभाऊ साठे : लेखनाची प्रेरणा - डॉ. राजेंद्र बगाटे

समाजातील उपेक्षित, शोषित आणि वंचित घटकांच्या जीवनाला आपल्या सशक्त लेखणीतून शब्दबद्ध करणारे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे मराठी साहित्यातील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या साहित्याने केवळ मराठी साहित्य समृद्ध केले नाही, तर सामाजिक परिवर्तनाची चळवळही अधिक व्यापक केली. त्यांनी आयुष्यभर लेखणीला समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन मानले आणि साहित्याच्या माध्यमातून अन्याय, विषमता, गरिबी, शोषण आणि मानवी वेदना यांना वाचा फोडली. म्हणूनच त्यांच्या साहित्यिक योगदानाचे स्मरण आणि नव्या पिढीमध्ये लेखनाची प्रेरणा जागविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 1 ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिन 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमामागील मूलभूत हेतू म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याने, प्रत्येक तरुणाने आणि प्रत्येक संवेदनशील नागरिकाने लेखनाच्या माध्यमातून समाजाशी नाते जोडावे, आपले विचार सुसंस्कृतपणे व्यक्त करावेत आणि मराठी साहित्यविश्व अधिक समृद्ध करावे हा आहे. शासन परिपत्रकातही स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक कार्याच्या स्मरणार्थ समाजातील सर्व स्तरांतील प्रतिभावंतांना लेखनाची प्रेरणा मिळावी आणि शैक्षणिक संस्थांमध्ये विविध साहित्यिक उपक्रम आयोजित व्हावेत.1 ऑगस्ट 1920 रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे जन्मलेल्या अण्णाभाऊ साठे यांचे बालपण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत गेले. त्यांना शालेय शिक्षण फारसे घेता आले नाही; परंतु जीवनाच्या कठीण अनुभवांनी त्यांना घडविले. परिस्थितीमुळे त्यांचे कुटुंब मुंबईत स्थलांतरित झाले. गिरणगावातील कष्टकरी जीवन, झोपडपट्ट्यांतील संघर्ष, कामगारांचे हाल, जातीय विषमता आणि सामाजिक अन्याय त्यांनी अत्यंत जवळून अनुभवला. याच अनुभवांनी त्यांच्या साहित्याला वास्तववादी स्वरूप प्राप्त झाले. त्यांनी पुस्तकांमधून जितके शिकले, त्याहून अधिक समाजातून शिकले. त्यामुळे त्यांचे साहित्य कृत्रिम न वाटता जिवंत जीवनाचा आरसा बनले. त्यांनी कधीही राजवाड्यांतील वैभवाची कथा लिहिली नाही; त्यांनी झोपडीतील माणसाचे अश्रू, घाम आणि संघर्ष यांनाच आपल्या साहित्याचा केंद्रबिंदू बनविले.अण्णाभाऊ साठे हे लोकशाहीर म्हणून जितके लोकप्रिय होते तितकेच ते एक समर्थ कादंबरीकार, कथाकार, लोकनाट्यकार आणि सामाजिक विचारवंत होते. त्यांनी विविध साहित्यप्रकारांत विपुल लेखन केले. त्यांच्या साहित्यामध्ये श्रमिक, दलित, स्थलांतरित, शेतमजूर, स्त्रिया, कष्टकरी आणि समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेल्या माणसांचे जीवन अत्यंत प्रभावीपणे चित्रित झाले आहे. त्यांनी साहित्याला केवळ सौंदर्याचा विषय न मानता समाजपरिवर्तनाचे प्रभावी शस्त्र बनविले. त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीत संघर्ष आहे, स्वाभिमान आहे, मानवी प्रतिष्ठेचा आग्रह आहे आणि समतेचा संदेश आहे.त्यांच्या 'फकिरा' या कादंबरीने मराठी साहित्याला नवी दिशा दिली. अन्यायाविरुद्ध झुंज देणाऱ्या सामान्य माणसाच्या संघर्षाचे चित्रण करणारी ही कादंबरी आजही सामाजिक साहित्याचा मानदंड मानली जाते. त्याचप्रमाणे त्यांच्या असंख्य कथा, पोवाडे, लावण्या आणि लोकनाट्यांनी जनतेमध्ये सामाजिक जाणीव निर्माण केली. लोकभाषेतील सहजता, कथनातील ओघवतेपणा आणि वास्तववादी आशय यामुळे त्यांचे साहित्य सर्वसामान्यांच्या मनात घर करून राहिले. त्यांनी लोककलेला परिवर्तनाची दिशा दिली आणि शाहिरीला सामाजिक बांधिलकीचे स्वरूप प्राप्त करून दिले.अण्णाभाऊ साठे यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कधीही स्वतःच्या वैयक्तिक यशासाठी लेखन केले नाही. त्यांच्या लेखणीचा उद्देश समाजातील अन्याय उघड करणे, वंचितांच्या भावना व्यक्त करणे आणि सामान्य माणसाला आत्मविश्वास देणे हा होता. त्यांनी आपल्या साहित्यामधून स्वाभिमान, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा सातत्याने पुरस्कार केला. त्यांच्या मते लेखक हा समाजाचा जागरूक प्रहरी असतो. तो केवळ घटनांचे वर्णन करत नाही, तर समाजाला विचार करायला भाग पाडतो. त्यामुळे त्यांचे साहित्य आजही तितकेच समकालीन आणि प्रेरणादायी वाटते.आजच्या डिजिटल युगात अभिव्यक्तीची अनेक माध्यमे उपलब्ध झाली आहेत. सामाजिक माध्यमे, संकेतस्थळे, ब्लॉग, ई-पुस्तके आणि विविध डिजिटल व्यासपीठांमुळे प्रत्येकाला आपले विचार मांडण्याची संधी मिळाली आहे. मात्र अभिव्यक्तीची ही संधी जबाबदारीने वापरणे तितकेच महत्त्वाचे आहे. माहितीचा वेग वाढला असला तरी विचारांची खोली कमी होत असल्याची खंत अनेक साहित्यिक व्यक्त करतात. अशा काळात अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य आपल्याला शिकवते की लेखन हे केवळ प्रसिद्धी मिळविण्याचे साधन नसून समाजाप्रती असलेल्या उत्तरदायित्वाची अभिव्यक्ती आहे. लेखकाने सत्याचा शोध घेतला पाहिजे, मानवी मूल्यांचा सन्मान केला पाहिजे आणि समाजातील सकारात्मक परिवर्तनासाठी लेखणीचा उपयोग केला पाहिजे.याच व्यापक विचारातून महाराष्ट्र शासनाने 'लेखन प्रेरणा दिन' साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. शासन परिपत्रकानुसार विद्यापीठे, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये कविता, कथा, निबंध लेखन स्पर्धा, वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा, स्थानिक साहित्यिकांच्या मुलाखती व व्याख्याने, ग्रंथदिंडी, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे वाचन, त्यांच्या व्यक्तिमत्त्व व साहित्यावर व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा आणि साहित्य संमेलनांचे आयोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या उपक्रमांचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी, लेखनाची आवड आणि साहित्यिक संवेदनशीलता विकसित करणे हा आहे.लेखन ही केवळ शब्दांची मांडणी नसते; ती विचारांची शिस्त, संवेदनशीलतेची अभिव्यक्ती आणि समाजाशी असलेल्या नात्याची जाणीव असते. जेव्हा एखादा विद्यार्थी कविता लिहितो, कथा रचतो, निबंध मांडतो किंवा एखाद्या सामाजिक विषयावर आपले मत व्यक्त करतो, तेव्हा तो केवळ लेखन करत नसतो; तो आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकासही करत असतो. लेखनामुळे निरीक्षणशक्ती वाढते, चिकित्सक दृष्टी विकसित होते, भाषेवर प्रभुत्व मिळते आणि समाजातील विविध प्रश्नांकडे अधिक व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची क्षमता निर्माण होते. म्हणूनच 'लेखन प्रेरणा दिन' हा केवळ साहित्यिक कार्यक्रम नसून विचारक्षम, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडविण्याचा एक प्रभावी सामाजिक उपक्रम आहे.आजच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल माध्यमे आणि सामाजिक माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे अभिव्यक्तीची साधने बदलली असली तरी प्रभावी लेखनाचे महत्त्व अजिबात कमी झालेले नाही. उलट माहितीच्या प्रचंड प्रवाहात सत्य, विवेक, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारी जपणारे लेखन अधिक आवश्यक बनले आहे. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या काळात लेखणीला परिवर्तनाचे शस्त्र बनविले; आजच्या पिढीने तीच लेखणी ज्ञान, विज्ञान, लोकशाही, संविधानिक मूल्ये आणि मानवी संवेदनशीलता यांची वाहक बनविण्याची गरज आहे. लेखन प्रेरणा दिनाचा खरा अर्थ केवळ लेखनस्पर्धा आयोजित करणे एवढाच नसून विद्यार्थ्यांमध्ये प्रश्न विचारण्याची वृत्ती, चिकित्सक विचारसरणी, कल्पकता आणि सामाजिक बांधिलकी विकसित करणे हा आहे.लेखन ही एक सर्जनशील प्रक्रिया आहे. ती माणसाला स्वतःशी संवाद साधायला शिकवते. वाचनातून विचार जन्माला येतात आणि विचारांमधून लेखन घडते. त्यामुळे लेखन प्रेरणा दिन हा प्रत्यक्षात वाचन संस्कृतीलाही बळ देणारा उपक्रम आहे. ज्या समाजात वाचनाची सवय दृढ असते, त्या समाजात विचारांची देवाणघेवाण समृद्ध होते, मतभिन्नतेचा आदर वाढतो आणि लोकशाही अधिक मजबूत होते. अण्णाभाऊ साठे यांनी स्वत: औपचारिक शिक्षणाची मर्यादा असतानाही सातत्याने वाचन, निरीक्षण आणि अनुभव यांच्या बळावर स्वतःला घडविले. त्यामुळे त्यांचे जीवन प्रत्येक विद्यार्थ्याला एक महत्त्वाचा संदेश देते की परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी जिद्द, जिज्ञासा आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या जोरावर मोठे साहित्य निर्माण करता येते.आज शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये लेखन कौशल्य विकसित करण्यासाठी विविध उपक्रमांची आवश्यकता आहे. शासनाच्या परिपत्रकातही कविता, कथा, निबंध लेखन स्पर्धा, वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा, स्थानिक साहित्यिकांची व्याख्याने, ग्रंथदिंडी, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे वाचन, त्यांच्या व्यक्तिमत्त्व व साहित्यावर चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा आणि साहित्य संमेलनांचे आयोजन करण्यावर भर देण्यात आला आहे. हे उपक्रम विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना देतात, भाषिक कौशल्य वाढवितात आणि साहित्याबद्दल आत्मीयता निर्माण करतात.लेखनाची खरी प्रेरणा पुरस्कारातून नव्हे, तर समाजाशी असलेल्या नात्यातून निर्माण होते. जेव्हा लेखक समाजातील वेदना अनुभवतो, सामान्य माणसाच्या आशा-आकांक्षा समजून घेतो आणि त्या प्रामाणिकपणे शब्दबद्ध करतो, तेव्हा त्याचे साहित्य काळाच्या कसोटीवर टिकते. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य याच कारणामुळे आजही अभ्यासले जाते. त्यांनी कधीही कल्पनारम्य वैभवाचे चित्र रंगविले नाही; त्यांनी वास्तवाला शब्द दिले. त्यांच्या लेखनातील पात्रे ही संघर्ष करणारी, स्वाभिमान जपणारी आणि परिवर्तनाची स्वप्ने पाहणारी माणसे आहेत. त्यामुळे त्यांचे साहित्य केवळ एका समाजघटकाचे प्रतिनिधित्व करत नाही, तर संपूर्ण मानवतेच्या संघर्षाची गाथा बनते.मराठी भाषा ही संत, समाजसुधारक, विचारवंत आणि साहित्यिक यांच्या समृद्ध परंपरेने घडलेली भाषा आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कुसुमाग्रज, पु. ल. देशपांडे, विंदा करंदीकर आणि अण्णाभाऊ साठे यांसारख्या अनेक थोर व्यक्तींनी आपल्या लेखणीतून समाजमन घडविले. या परंपरेचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी आजच्या तरुण पिढीवर आहे. लेखन प्रेरणा दिन हा त्या जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने, संशोधकाने, शिक्षकाने आणि साहित्यप्रेमीने आपल्या अनुभवांना, निरीक्षणांना आणि विचारांना शब्दरूप देण्याचा संकल्प या दिवशी करणे आवश्यक आहे.लेखन ही समाजपरिवर्तनाची शांत पण अत्यंत प्रभावी प्रक्रिया आहे. तलवारीने जिंकलेली मने काळानुसार बदलतात; परंतु विचारांनी जिंकलेली मने कायमस्वरूपी परिवर्तन घडवितात. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून हेच सिद्ध करून दाखविले. त्यांच्या लेखणीत संघर्ष होता, पण द्वेष नव्हता; विद्रोह होता, पण विध्वंस नव्हता; अन्यायाविरुद्ध प्रखर आवाज होता, पण मानवतेवरील विश्वास कधीही डळमळला नाही. म्हणूनच त्यांचे साहित्य आजही सामाजिक समता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेचे प्रभावी प्रतीक मानले जाते.आजच्या काळात लेखन केवळ साहित्यनिर्मितीपुरते मर्यादित राहिलेले नाही. संशोधन, पत्रकारिता, विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, न्यायव्यवस्था, शिक्षण, उद्योग, सामाजिक कार्य आणि डिजिटल माध्यमे अशा प्रत्येक क्षेत्रात प्रभावी लेखनाचे महत्त्व वाढत आहे. विचार स्पष्टपणे आणि जबाबदारीने मांडण्याची क्षमता ही यशस्वी व्यक्तिमत्त्वाची ओळख बनली आहे. त्यामुळे लेखन प्रेरणा दिन हा केवळ साहित्यिक कार्यक्रम नसून ज्ञानाधिष्ठित समाज निर्माण करण्याच्या व्यापक ध्येयाशी जोडलेला उपक्रम आहे.अण्णाभाऊ साठे यांचे जीवन हे आशावाद, संघर्ष आणि सर्जनशीलतेचा प्रेरणादायी प्रवास आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून त्यांनी जागतिक कीर्तीचे साहित्यिक म्हणून स्वतःचे स्थान निर्माण केले. त्यांनी सिद्ध केले की लेखक घडण्यासाठी संपन्न साधने नव्हे, तर जिद्द, संवेदनशीलता आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी आवश्यक असते. त्यांचे संपूर्ण जीवन नवोदित लेखकांसाठी एक प्रेरणादायी विद्यापीठ आहे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांच्या विचारांचा वारसा जपत समाजहिताचे, मानवतावादी मूल्यांचे आणि सत्यनिष्ठेचे लेखन करणे.1 ऑगस्ट रोजी साजरा होणारा 'लेखन प्रेरणा दिन' हा केवळ एका महान साहित्यिकाच्या जयंतीचे औचित्य नसून विचार, वाचन, लेखन आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा उत्सव आहे. प्रत्येक शैक्षणिक संस्थेत, प्रत्येक ग्रंथालयात आणि प्रत्येक घरात या दिवसाच्या निमित्ताने वाचनाची, चिंतनाची आणि लेखनाची नवी चळवळ सुरू झाली, तर तीच अण्णाभाऊ साठे यांना खरी आदरांजली ठरेल. त्यांच्या लेखणीने पेटविलेली सामाजिक जागृतीची मशाल आजच्या पिढीने ज्ञान, समता, न्याय आणि मानवतेच्या प्रकाशाने अधिक तेजस्वी करावी, हाच 'लेखन प्रेरणा दिनाचा' खरा संदेश आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत)**

**bagate.rajendra५@gmail.com**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०१ ऑगस्ट २०२६


# राज्यात सलग आठव्या दिवशी मुसळधार



**छत्रपती संभाजीनगर :** ज्यात सलग आठव्या दिवशीही पावसाचा जोर कायम असून विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी मुसळधार सरी कोसळत आहेत. नाशिक घाटमाथ्यासाठी रेड अलर्ट, तर छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यातील काही भागांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. गडचिरोलीत पूरस्थिती निर्माण झाली असून जळगाव, विदर्भ आणि नांदेडच्या किनवट तालुक्यात जोरदार पावसाची नोंद झाली आहे. दरम्यान, जून-जुलै या दोन महिन्यांत राज्यात सरासरीच्या तुलनेत केवळ 96.4 टक्के, तर मराठवाड्यात 82.1 टक्के पावसाची नोंद झाली आहे.


•मराठवाड्यात यंदाच्या पहिल्या दोन महिन्यात ८२.१% पाऊस

•नाशिक घाटमाथ्यावर आज रेड, संभाजीनगरात यलो अलर्ट

•जळगाव, विदर्भात मुसळधार तर संभाजीनगरात जोरदार जलधारा

रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील शिवथर खोऱ्यात संततधार पावसामुळे नद्या-नाले दुथडी भरून वाहत आहेत. कुंबे शिवथर येथील पुलावरून पाणी वाहत असल्याने आंबेनळी, आंबे शिवथर आणि सह्याद्री वाडी या ३ गावांचा तालुक्याशी संपर्क तुटला आहे.सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यात मुसळधार पावसामुळे दिवशी घाटात दोन ठिकाणी दरड कोसळल्याने ढेबेवाडी–नवरस्ता मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. तसेच वाढत्या पाण्यामुळे जुना संगमनगर पूल पाण्याखाली गेला असून परिसरातील वाहतुकीवर परिणाम झाला आहे. प्रशासनाने नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय प्रवास टाळण्याचे आवाहन केले असून परिस्थितीवर सतत लक्ष ठेवले जात आहे.णे जिल्ह्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे धरणांच्या पाणी पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. यामुळे खडकवासला, निरा देवघर, भामा आसखेड आणि पानशेत या चार प्रमुख धरणांतून मोठ्या प्रमाणात पाणी नदीपात्रात सोडण्यात येत आहे. नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून, प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.जळगाव जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे चाळीसगाव येथील १०० वर्षांहून अधिक जुन्या नगरपालिकेच्या इमारतीचा काही भाग कोसळला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. संबंधित इमारतीत प्रशासकीय कामकाज होत नसून स्वच्छता व पालिकेचे साहित्य ठेवण्यासाठी तिचा वापर केला जात असल्याने मोठी दुर्घटना टळली.पुण्यातील खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवून ४५ हजार क्युसेकपर्यंत सोडण्याची तयारी करण्यात आली आहे. त्यामुळे नदीकाठच्या परिसरातील नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन खडकवासला पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांनी केले आहे. प्रशासनाने नागरिकांना सुरक्षित राहण्याचे आणि नदीपात्रात जाणे टाळण्याचे आवाहन केले आहे.

# अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांतला विद्रोह : जखमांमधून उगवलेला सूर्य - डॉ. बाळासाहेब लिहिणार



अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्या उघडल्या की अक्षरांचा सुगंध येत नाही; मातीचा वास येतो. शाईचा रंग दिसत नाही; घाम, रक्त आणि अश्रूंचा रंग दिसतो. पानं उलटताना एखाद्या राजदरबाराचे दरवाजे उघडत नाहीत, तर चिखलाने माखलेल्या वस्त्या, भुकेने व्याकूळ झालेली लेकरं, विटाळाच्या नावाने गावाबाहेर ढकललेली माणसं, गिरण्यांच्या धुरात काळवंडलेले कामगार आणि जगण्याशी रोज दोन हात करणारा समाज आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो.अण्णाभाऊंच्या कादंबऱ्या वाचताना जाणवतं—हे साहित्य टेबलावर बसून लिहिलेलं नाही; ते रस्त्यावर चालताना, पोटात भूक घेऊन जगताना, अपमान पचवत जगणाऱ्या माणसांच्या सोबतीने घडलेलं आहे. म्हणूनच त्यांच्या प्रत्येक पात्राच्या श्वासात विद्रोह आहे.हा विद्रोह कोणावर वैयक्तिक सूड उगवणारा नाही. तो त्या व्यवस्थेविरुद्ध आहे जिने माणसाला माणूस म्हणून जगू दिले नाही. तो त्या समाजाविरुद्ध आहे ज्याने जातीच्या नावाने माणसाच्या कपाळावर हीनतेचा शिक्का मारला. तो त्या अर्थव्यवस्थेविरुद्ध आहे जिथे श्रम करणारा उपाशी आणि श्रम लुटणारा सुखात जगतो.अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांतील नायक तलवारी घेऊन जन्माला येत नाहीत; ते भूक घेऊन जन्माला येतात. पण भूकच त्यांना बंड शिकवते. अपमान त्यांना उभं राहायला शिकवतो. अन्याय त्यांना आवाज देतो. म्हणून त्यांच्या कादंबऱ्यांतील विद्रोह हा हिंसेचा नसून स्वाभिमानाचा आहे.फकिरा हे त्याचे सर्वात तेजस्वी उदाहरण आहे. फकिरा केवळ एक पात्र नाही; तो इतिहासाच्या काळ्याकुट्ट पानांवर उठून दिसणारा स्वाभिमानाचा उजेड आहे. तो स्वत:साठी जगत नाही; तो आपल्या लोकांसाठी उभा राहतो. त्याच्या हातातली ताकद शस्त्रांची नसते; ती न्यायावरच्या विश्वासाची असते. म्हणून फकिरा पराभूत झाला तरी त्याचा विद्रोह जिंकत राहतो.अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांतील स्त्रिया देखील विद्रोहाच्या मशाली आहेत. त्या केवळ रडत नाहीत, तर जगाशी दोन हात करतात. त्यांचं मौनही प्रश्न विचारतं आणि त्यांचा संघर्ष समाजाच्या विवेकाला हादरा देतो. त्यांनी स्त्रीला दयेची प्रतिमा न बनवता सामर्थ्याची प्रतिमा बनवली.त्यांच्या कादंबऱ्यांतील भूक ही फक्त पोटाची भूक नाही; ती सन्मानाची भूक आहे. त्यांच्या पात्रांना फक्त भाकरी नको असते; त्यांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार हवा असतो. म्हणून त्यांच्या कथांमध्ये भाकरी आणि स्वाभिमान यांचं नातं अविभाज्य आहे.अण्णाभाऊ म्हणतात असे वाटते—जग बदलायचं असेल तर आधी माणसाला त्याच्या जखमा दाखवा. जखम लपवणारे साहित्य समाजाला झोपवतं; जखम उघडी करणारे साहित्य समाजाला जागं करतं. त्यांच्या कादंबऱ्या जागं करणाऱ्या आहेत.त्यांच्या लेखणीतला विद्रोह घोषणांच्या गदारोळात हरवत नाही. तो एखाद्या भुकेल्या मुलाच्या डोळ्यांत दिसतो. विहिरीवर पाणी भरताना अपमानित झालेल्या स्त्रीच्या ओठांवर दिसतो. गिरणीत दिवसभर राबूनही रिकाम्या हाताने घरी परतणाऱ्या कामगाराच्या शांत चेहऱ्यात दिसतो. अण्णाभाऊंनी त्या शांततेलाच आवाज दिला.त्यांच्या कादंबऱ्या वाचताना जाणवतं की समाजात सर्वात मोठी शोकांतिका गरीबी नाही; माणसाच्या माणूसपणाचा अपमान ही आहे. म्हणून त्यांच्या पात्रांचा लढा संपत्तीचा कमी आणि प्रतिष्ठेचा अधिक आहे. हा लढा आजही अपूर्ण आहे, म्हणून अण्णाभाऊ आजही समकालीन आहेत.अण्णाभाऊंच्या साहित्याने मराठी कादंबरीला नवा नायक दिला. हा नायक राजघराण्यातला नव्हता; तो झोपडीतला होता. तो सिंहासनावर बसलेला नव्हता; तो रानात, रस्त्यावर, कारखान्यात, वस्तीवर घाम गाळत होता. साहित्याच्या केंद्रस्थानी पहिल्यांदाच समाजाच्या कडेला उभा असलेला माणूस आला. हीच त्यांची सर्वात मोठी क्रांती होती.त्यांच्या कादंबऱ्यांतील विद्रोह द्वेष शिकवत नाही; तो अन्याय नाकारायला शिकवतो. तो सूडाची भाषा बोलत नाही; तो समतेची भाषा बोलतो. तो विध्वंसाचा पुरस्कार करत नाही; तो नव्या समाजाच्या निर्मितीचं स्वप्न दाखवतो. म्हणून त्यांच्या विद्रोहात करुणाही आहे आणि क्रांतीची जिद्दही.आज आपण डिजिटल युगात जगत आहोत; पण जात अजूनही जिवंत आहे, विषमता अजूनही जिवंत आहे, श्रमाचे शोषण अजूनही सुरू आहे. त्यामुळे अण्णाभाऊंच्या कादंबऱ्या भूतकाळाचा दस्तऐवज म्हणून नव्हे, तर वर्तमानाचा आरसा म्हणून वाचल्या पाहिजेत. त्या प्रत्येक पिढीला विचारतात—"तुमच्या सभ्यतेत अजूनही माणूस कमी आणि जात मोठी का आहे?"अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांतील विद्रोह हा रागाचा उद्रेक नाही; तो माणुसकीचा आग्रह आहे. तो समतेच्या पहाटेची चाहूल आहे. तो अन्यायाच्या अंधारात पेटवलेला दिवा आहे. आणि म्हणूनच अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्या वाचून पुस्तक बंद होतं, पण मनात एक न संपणारा प्रश्न उघडा राहतो—ज्यांच्यासाठी हा विद्रोह लिहिला गेला, त्यांना न्याय देणारा समाज आपण खरोखर उभारला आहे का?जोपर्यंत या प्रश्नाचं उत्तर ठाम "होय" होत नाही, तोपर्यंत अण्णाभाऊंच्या कादंबऱ्या केवळ साहित्य राहणार नाहीत; त्या संघर्षाची मशाल, स्वाभिमानाचा ध्वज आणि माणूसपणाचा अखंड जाहीरनामा म्हणून जिवंत राहतील.


**डॉ. बाळासाहेब लिहिणार**
**मो. ९४२१२ ४५३०९**



## प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.